सार्थ-मनाचे-श्लोक

[जय जय रघुवीर समर्थ]



जिज्ञासा प्रकाशन, बेळगांव.

सार्थ-मनाचे-श्लोक

-: संपादक :-

समर्थभक्त शां. श्री. सुंठणकर, बेळगांव.

-: प्रकाशक :-

जिज्ञासा-प्रकाशन,

ड/४७४ "शांता-निवास", शेरी-गल्ली, बेळगांव

-: पुष्प पांचवें :-

-: मुद्रक :-

दि. बेळगांव प्रिंटींग प्रेस, बेळगांव.

श्रीदास नवमी, १५-२-१९७४ श्रीशके १८९५ } द्वितीय आवृत्ति { मूल्य १रु३०पै.

० संपादकीय निवेदन ०

मानवी जीवन अडचणी, अडथळे, दैन्य, दुःख, निराशा व अपयश अशा असह्य गोष्टींनी ओतप्रत भरलेलें आहे. असें असलें तरी या अपरिमित दुःख यातनांचा बाऊ कमी करून त्या सुसाह्य मानून घेण्याचा मनाचा कल तयार करून त्याला दिलासा, धैर्य व समाधान प्राप्त करून देण्याची अमोलिक कामगिरी संत लोक आपल्या उपदेशाने पार पाडीत असतात. समाजातील नीतिधैर्य वाढीस लावण्याची अप्रतिम कामगिरी पार पाडणारे संत उपदेशासारखें अन्य साधन दुर्लभ होय. संतसद्गुरु समर्थ रामदास स्वामी असेच समाजोद्धार करणारे एक अलौकिक संत होऊन गले. समर्थ रामदास स्वामी होऊन गेले त्याकालपर्वात भारतांत सर्वत्र व विशेषत: महाराष्ट्रांत अहाकार उडून गेला होता. औरंगजेबासारखा धर्मवेडा, कर्मठ व अत्यंत क्रूर बादशहा दिल्लीच्या तक्तांवर बसलेला होता. मुसलमानांच्या अत्यंत असह्य जुलूमशाहीखाली महाराष्ट्र समाज हलाखीत खितपत पडलेला होता त्याला कोणी त्राता नव्हता. अशा आणिबाणीच्या वेळीं

समर्थांनी समाजास धीर दिलासा देऊन त्याचें नीतिधैर्य वाढीस लावण्याचे महान कार्य हाती घेतले व प्रचाराची यंत्रणा उभी केली. त्याचा योग्य तो परिणाम होऊन महाराष्ट्र समाजाचा सर्वतोपरीने उद्धार झाला. मराठी जीवनास कलाटणी मिळून एका तेजस्वी नव्या पर्वास प्रारंभ झाला. समर्थांच्या उपदेश-प्रेरणेने शिवाजी महाराजासारखे अद्वितीय लोक कार्य करू लागले. समर्थांनी राष्ट्रधर्म हाच खरा समाज धर्म असा नवा पायंडा घालून स्वराज्य राष्ट्राची मुहूर्तमेढ रोवली. किंबहुना स्वराज्याच्या राष्ट्रीय भावनेचा पाया घालण्याचें कार्य भारतात प्रथम समर्थांनी केलें. समर्थांच्या प्रेरणेने शिवाजी महाराजानी स्वराज्य स्थापिलें व मराठी राज्याची ग्वाही सर्वत्र भगवा झेंडा फडकावून केली. हा मराठी भगवा झेंडा राष्ट्रधर्माचें प्रतिक होय. हा भगवा झेंडा श्रीसमर्थांनी शिवाजी महाराजाना दिलेला होता. आजहि हा भगवा ध्वज आपण सर्वांनी शिरोधारी मानला पाहिजे.

समर्थांनी महाराष्ट्राचा पुनरोद्धार करण्यासाठी ज्या उपदेश वाङ्मयाचा पुरस्कार केला व तें वाङ्मय

त्याकाळीं तर अतोनात लोकप्रिय झालेच, आजहि तें अतिशय लोकप्रिय आहे व ते पुढें सुद्धा चिरकालपर्यंत लोकमानसाची पक्की व अचूक पकड घेतल्याविना राहणार नाही. समर्थांच्या सर्व ग्रंथांत मनाचे-श्लोक अथवा मनोबोध सर्वात जास्ती लोकप्रिय आहे. महाराष्ट्रांत अबालवृद्धांच्या तोंडी मनाचे श्लोक बसलेले असून विशेषत: ब्राम्ही मुहूर्तावर हे श्लोक म्हणण्याचा परिपाठ पडून गेलेला आहे. पूर्वी प्राथमिक शाळातून हे मनाचे-श्लोक तोंडपाठ करून घेण्यांवर कटाक्षपूर्वक भर दिला जाई. आजमितीस सुद्धा लहान मुलाना मनाचे-श्लोक पाठ करवून घेण्याकडे पालकांचे लक्ष वेधलें जात आहे. माझे प्राथमिक शाळेचें शिक्षक व माझे प्रेमळ हितचिंतक, समर्थभक्त श्री चुडामणी यल्लूसा धोंगडी, शहापूर, बेळगांव यांच्या सहवासामुळें लहानपणापासून समर्थांचे मनाचे श्लोक एकसतत कानीं पडत गेल्याने समर्थ व समर्थांच्या समग्र वाङ्मयाची आस्था वाढत गेली. श्री.धोंगडी मास्तरानीं सोप्या व सुटसुटीत अर्थासह मनाच्या श्लोकाची स्वस्त आवृत्ति काढावी अशी सूचना

केल्यामुळें ही आवृत्ति वाचकांच्या हाती लवकर पड शकली. वस्तुत: या पुस्तकाचे अर्थ लिहीण्याचें काय करण्या इतपत माझी योग्यता नसता सुद्धा मी हा लहान तोंडी मोठा घास घेतला आहे असें मला वाटते. अनेक जन्मीच्या सुप्राक्तनामुळे श्रीसमर्थ व समर्थ तत्वज्ञानाचा ओढा मला लागला व श्रीसमर्थांची अशा प्रकारें सेवा करण्याचा सुयोग माझ्या पदरी पडला यात मी स्वत:स धन्य व भाग्यवान समजतो. अशाच प्रकारें समग्र समर्थ वाङ्मय प्रसिद्ध करण्याचा माझा मानस आहे.

या पुस्तकांत श्री समर्थांचें व श्रीसमर्थांचें आराध्य दैवत, चाफळच्या प्रभु श्रीरामाचें छायाचित्र मुद्दाम घातलें आहे. माझी हीं अल्पशी सेवा वाचकानी गोड मानून घ्यावी.

श्रीसमर्थ सेवक

शां. श्री. सुंठणकर

बेळगांव,
श्रीराम नवमी,
दि. १९-४-७०

दुसरी आवृत्ति
फेब्रुवारी, १९७४

नित्य वाचनाच्या प्रारंभी ही प्रार्थना म्हणून मग वाचनांस प्रारंभ करावा.

प्रार्थना

उपासनेला दृढ चालवावें । भूदेव संतासि सदा नमावें ॥
सत्कर्मयोगें वय घालवावें । सर्वांमुखी मंगल बोलवावे ॥
ज्या ज्या ठिकाणीं मन जाय माझें । त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे ॥
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी । तेथें तुझे सद्गुरू पाय दोन्ही ॥
मला वाटते अंतरीं त्वा वसावें । तुझ्या मनोबोधिसि त्वा बोधवावें ॥
आपत्त्या परी पाववी प्रेम प्रासा । महाराजया सद्गुरू रामदासा ॥
शुका सारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें । वसिष्ठी परि ज्ञान योगेश्वराचें ॥ कवि वाल्मिका सारिखा मान्य ऐसा नमस्कार माझा सद्गुरु रामदासा ॥

नित्य वाचनपाठ संपल्यांवर खालील आरती म्हणावी,

मनोबोधाची आरती

जयदेव जयदेव जय मनोऽबोधा ।
पंचप्राणें आरती तुज स्वात्मशुद्धा ॥
जयदेव जयदेव ॥ ध्रु. ॥
वेदांचें जें गुह्य शास्त्रांचें जें सार ।
प्राकृत शब्दांमाजी केला विस्तार ॥
कर्म उपासना ज्ञान गंभीर ।
ज्याच्या मननें मात्रें आत्मा गोचर ॥१॥
जयदेव जयदेव जय मनोबोधा ।
पंचप्राणें आरती तुज स्वात्म शुद्धा ॥
जय देव जय देव ॥ ध्रु. ॥
दोन शतें पांच श्लोक हे जाण ।
श्रवणें अर्थें साधक पावति हे खूण ॥
परमार्थासी सुलभ मार्ग हा पूर्ण ।
यशवंत सद्गुरू दासाचा प्राण ॥२॥
जयदेव जयदेव जय मनोबोधा ।
पंचप्राणें आरती तुज स्वात्मशुद्धा ॥
जयदेव जयदेव ॥ ध्रु ॥

० श्रीसद्गुरु समर्थांची आरती ०

जयदेव जयदेव जय श्रीरामऽदासा ।
आरती ओवाळू तुज सद्गुरुदासा ।
जयदेव जयदेव ॥ ध्रु ॥

रामदास मूर्तिमंत । रामचंद्र अवतार ।
कलियुगीं अवतरोनी । केला भक्तांचा उद्धार ॥१॥

वैराग्य भक्तिज्ञान । शांति क्षमा विरक्ति ।
विवेक सालंकृत । क्षमा दया सर्वभूतीं ॥२॥

सच्चिदानंद घन । रामदास केवळ ।
दिनकर कृपायोगें । रामचंद्र निर्मळ ॥३॥

जयदेव जयदेव जय श्रीरामदासा ।
आरती ओवाळू तुज सद्गुरु रामदासा ।
जयदेव जयदेव ॥ ध्रु ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

卐 ॥ श्रीगणेशाय नमः ॥ 卐

श्रीसमर्थ रामदास स्वामींचे

卐 मनाचे - श्लोक 卐

॥ श्रीराम ॥

○ जय जय रघुवीर समर्थ ○

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा ।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा ।
गमूं पंथ आनंत या राघवाचा ॥१॥

जो सर्व देवांचा प्रमुख आहे, जो सर्व प्रकारच्या सद्‌गुणांचा निर्माता देव आहे, अमूर्त स्वरूपांत असणाऱ्या निर्गुणाचा म्हणजे परब्रह्माचा, मूळ चा म्हणजे सर्व प्रथम सगुण-मूर्त स्वरूपांतील अवतार धारण करून जो प्रगट झाला, त्या विघ्नहर्त्या

श्रीगणेश देवास आणि त्याच्या सोबत परा, पश्यंति, मध्यमा व वैखरी म्हणजे वाचा या वाचेच्या चार अवस्थांची जननी जी विद्या देवता शारदा, या दोघाना अत्यंत मनोभावें नमन करून आता प्रभु श्रीरामचंद्रांच्या कर्म व भक्ति यांचा सुंदर समन्वय साधणाऱ्या ज्ञान–मार्गाची म्हणजे आनंत–पंथा संबंधीची सांगोपांग माहिती आपणास येथें समजावून घ्यावयाची आहे.

मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें ।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ।।
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें ।
जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ।।२।।

बा सज्जन मना, श्रीहरी जो परमात्मा जो तुला पावावा व मुक्ति–मोक्ष मिळावा असें तुला वाटत असेल तर तुझ्या जीवनांत भक्तिमार्गाच्या व्रताचा

स्वीकार दृढ निश्चयाने तू केला पाहिजेस. शिवाय जे जन म्हणजे सज्जन, साधु-संत लोक त्यानी ज्या ज्या गोष्टी त्याज्य म्हणजे आचरावयास निशिद्ध मानल्या आहेत, त्या त्या तुझ्या आचरणांतून तू घालवून देण्याचा एकसतत प्रयत्न केला पाहिजेस आणि संत-सज्जन लोकानी ज्या ज्या आचारसंहितांचा पुरस्कार केलेला आहे, त्या त्या सर्व गोष्टी तू आचरणांत बाणविण्याचा निधिध्यास स्वतःस लावून घेतला पाहिजेस. तर तुझे कल्याण होईल.

प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।
पुढें वैखरी राम आधीं वदावा ।।
सदाचार हा थोर सांडूं नये तो ।
जनीं तोचि तो मानवी धन्य होतो ।।३।।

ब्राम्हीमुहूर्तावर म्हणजे सूर्योदया पूर्वी एखादा तास अगोदर परमपवित्र प्रभु श्रीरामरायाचें

एकाग्र चित्ताने ध्यान करावें, चिंतन करावें त्यानंतर श्रीरामाचें मुखाने गान करावें, त्याचें स्तोत्र, स्तुति, भजन आदि मनोभावें करावें. बा मना, सदाचार-सद्‌वृत्तीच्या वर्तनाचें व्रत कधी खंडित करीत जाऊ नको. सदाचाराची निष्ठेने कास धरल्याने तू धन्य होशील व समाजांत अढळ असें श्रेष्ठ स्थान तुला प्राप्त होईल.

मना वासना दुष्ट कामा नये रे ।
मना सर्वथा पापबुद्धी नको रे ॥
मना धर्मता नीति सोडूं नको हो ।
मना अंतरीं सारवीचार राहो ॥४॥

बा मना, दुष्ट वृत्ती पासून कटाक्षपूर्वक दूर रहा बरें का! तुला पापबुद्धि कधी शिवणार नाही अशी कटाक्षपूर्वक दक्षता तू घेतली पाहिजेस धर्माने उपदेशिलेली नैतिक शिकवण सदैव अंगी

बाणण्याचा ख्रास प्रयत्न करीत रहा. सदासर्वदा सारासार विचाराने म्हणजे बिवेकी बुद्धीने कोणत्याहि गोष्टीचा विचार करण्याची सवय तू लावून घेतली पाहिजेस.

मना पापसकल्पं सोडूनि द्यावा ।
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा ॥
मना कल्पना ते नको वीषयांची ।
विकारें घडे हो जनीं सर्व ची ची ॥५॥

बा मना, पाप-संकल्प म्हणजे वाईट विचारां पासून तू पूर्णपणें अलिप्त राहिलें पाहिजेस आणि सत्य-संकल्प म्हणजे सद्विचारांचा पाठपुरावा करीत राहण्याचा निधिध्यास तू स्वतःस लावून घेतला पाहिजेस. मना, काम-वासनेच्या कल्पना करून मनोराज्यें बांधीत बसण्याच्या छंदा पासून तू पूर्णपणें अलिप्त राहीलें पाहिजेस नाहीपेक्षा

वासनेच्या आहारी गेल्याने अविवेकामुळे अनेक अधम कृत्यें घडून येतात- परिणामी समाज छी थू करतो व अवहेलनेची वागणूक देऊ लागतो. म्हणून विषयवासनेच्या आहारी जाणें तू सोड.

नको रे मना क्रोध हा खेदकारी ।
नको रे मना काम नाना विकारी ॥
नको रे मना सर्वदा अंगिकारू ।
नको रे मना मत्सरू दंभ भारू ॥६॥

रे मना, ज्या पायी परिणामी दुःख-यातना सहन कराव्या लागतात ती क्रोधी वृत्ति तू टाकली पाहिजेस. शिवाय ज्या कामवासनेच्या आहारी गेल्याने अनेक प्रमाद व अविवेकी कृत्यें होऊ लागतात, त्या काम-वासनेचा तू त्याग केला पाहिजेस. लोभलालसे पायी ठग-प्रवृत्ति बोकाळते. म्हणून लोभी वृत्ति पासून सुद्धा तू अलिप्त

राहिलें पाहिजेस. त्याच प्रमाणें विनाशाकडे नेणाऱ्या घमेंडी, गुर्मी वृत्ति पासून तू अलिप्त रहावेस. दुसऱ्याचा द्वेश–मत्सर करीत बसण्याची हीन व कुत्सित वृत्ति तू सोडून टाक, काम, क्रोध लोभ, दंभ व मत्सर या दुष्ट वृत्तीच्या पायी माणसाचा घोर विनाश होतो म्हणून तू त्या पासून पूर्णपणें अलिप्त राहून आपलें कल्याण साधून घेतले पाहिजेस.

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें ।
मना बोलणें नीच सोशीत जावें ।।
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावें ।
मना सर्व लोकांसि रे नीववावें ।।७।।

बा मना, तुझी वृत्ति तू खंबीर व खमकी बनव. म्हणजे संकटकालीं तू डगमगणार नाहीस व तुझें अवसान गळणार नाही. कोणी तुला अपशब्द

बोलल्यास तू संयमपूर्वक कानाडोळा कर.प्रत्युत्तर देऊ नको व वाद वाढवू नको. उद्धटपणा, उर्मटपणा या गोष्टी पासून तू पूर्णपणें अलिप्त राहीलें पाहिजेस. सदासर्वदा तुझी भाषा विनम्र व विनयशीलतेची असली पाहिजे. तुझ्या नम्र व प्रेमळ वाणीने व वागण्याने सर्व लोकाना संतोष-आनंद झाला पाहिजे

देह त्यागितां कीर्ती माग उरावी ।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावें ।
परी अंतरीं सज्जना नीववावें ।८॥

बा सज्जन मना, तू तुझ्या आयुष्यभर अशीं कृत्यें कर की जेणें करून तुझ्या मृत्यु नंतर सुद्धा तुझी सुकीर्ति गाजत रहावी. चंदन ज्या प्रमाणें स्वतः झिजून दुसऱ्यास सुगंध देऊन आनंद देत असते,

त्याच प्रमाणें तू कायावाचामनें करून लोक-कल्याणासाठी खपलें पाहिजेस. तुझी कृत्यें, तुझें वर्तन संत-सज्जन लोकाना संतोष देणारें असलें पाहिजे.

नको रे मना द्रव्य तें पूढिलांचें ।
अति स्वार्थबुद्धी न रे पाप सांचे ॥
घडे भोगणें पाप तें कर्म खोटें ।
न होतां मनासारिखे दुःख मोठें ॥९॥

बा मना, परद्रव्याची अभिलाषा तू मनांत कधीही बाळगू नको. दुसऱ्यांच्या धनाचा अपहार करण्याची हीन वृत्ति तू टाकून दे. हें सर्व अति लोभा मुळे होतें. म्हणून अप्पलपोटया स्वार्थी बुद्धीचा तू त्याग केला पाहिजेस. या स्वार्थीवृत्ति मुळे माणसाचें पाप मोठ्या प्रमाणांत वाढत जातें. लबाड कर्मे केलीं, अप्पलपोटेपणा केला

म्हणजे या खोटया कर्मामुळे जें पाप साचत जातें त्याचे अनिष्ठ फळ भोगण्या विना तुला गत्यंतर नसते. म्हणून अप्पलपोटी वृत्ति तू सोड. अप्पलपोटी स्वार्थी कावा साधण्या ऐवजी अपयश आल्याने जी दारूण निराशा होते,ती टाळण्यासाठी तू स्वार्थी वृत्ती टाकून दे.

सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी ।
दुःखाची स्वयें सांडि जीवीं करावी ॥
देहेदुःख ते सूख मानीत जावे ।
विवेकें सदा स्वस्वरूपीं भरावें ॥१०॥

सदा सर्वदा तू मनापासून श्रीरामाची भक्ति करीत जा. मानवी जीवन दुःखद गोष्टीनी ओतप्रत भरलेलें आहे. तरी स्वतःस होणाऱ्या दुःखा जवळ तू कानाडोळा केला पाहिजेस. येवढेच काय, देहास होणारें दुःख तू गोड मानून घेऊन

त्यांतच सुख मानण्याची वृत्ति तू मनास लावून घेतली पाहिजेस. दुःखास सुख मानण्याचा विवेक करून आत्माराम म्हणजे श्रीरामाच्या चिंतनांत, भक्तींत तू सदा सर्वदा मग्न रहावेस. म्हणजे दुःख गोड मानून घेण्याचा विवेक तुला जडू लागेल.

जनीं सर्व सूखी असा कोण आहे ।
विचारें मना तूंचि शोधूनि पाहें ॥
मना त्वांचि रें पूर्वसंचीत केलें ।
तयासारिखें भोगणें प्राप्त झालें ॥११॥

बा मना, या जगांत कोण सुखी आहे असें तुला वाटतें ? मानवी जीवन दुःखाने ओतप्रत भरलेलें असल्याने प्रत्येक माणूस जीवन भर दुःख भोगीत असतो. या जगांत कोणीहि सुखी नसून प्रत्त्येक जण दुःखी आहे. याची तू खात्री करून घे व स्वतःस होणाऱ्या दुःखाबद्दल खेद-वैषम्य मानू

नकोस. अरे मना, आयुष्य भर दु:ख तरी का भोगावें लागतें हें तुला ठाऊक आहे काय? तूं मागील जन्मी करून ठेवलेल्या पापकर्माच्या साठ्याचें प्रतिफळ म्हणून तुला या जन्मी दु:ख व यातना मोठ्या प्रमाणांत भोगाव्या लागतात. म्हणून तू पापबुद्धी पूर्णपणे टाकून दे.

मना मानसीं दु:ख आणूं नको रे।
मना सर्वथा शोक चिंता नको रे॥
विवेकें देहेबुद्धि सोडूनि द्यावी।
विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी॥१२॥

बा मना, तू मनांत कधीहि शिणत जाऊ नको. मनांतल्या मनांत कधी दु:खीकष्टी होऊ नको. जीवनांत पदोपदी संकटें उभी ठकतात. त्यामुळे एका पाठोपाठ एक चिंता सताऊ लागतात. तरी तू त्याना भिक घालू नको. मोठ्या धैर्याने व

जिद्दीने संकटाशी झुंज देऊन त्यांतून तू पार हो. जीवनात निराशेचे व दारुण दुःखाचे प्रसंग सुद्धा वारंवार येत असतात. खचून न जाता त्यांच्याशी तू निरगट्टपणें सामना देत रहा. मी म्हणजे माझा देह आणि देहास होणारें सुख-दुःख तें माझें ही देहबुद्धिभावना तू विवेकपूर्वक सोडून देऊन टाक. अशा प्रकारे मी म्हणजे माझा देह नसून मी म्हणजे परमात्मा प्रभु श्रीराम होय अशी विदेही अवस्था तुला प्राप्त झाली, तर तुला मुक्तीचा परमानंद भोगता येईल.

मना सांग पां रावणा काय जाले ।
अकस्मात तें राज्य सर्वै बुडालें ।
म्हणोनी कुडी वासना सांडि वेगीं ।
बळें लागला काळ हा पाठिलागीं ॥१३॥

रावणासारखा महाबलाढ्य राजा सुद्धा वेळ

भरून येताच निमिषार्धात नामोहरम झाला त्याचें चौदाचौकड्याचें बलाढ्य राज्यसुद्धा धुळीस मिळालें. हा देह अशाश्वत व नश्वर आहे हें जाणून या देहांवरची आसक्ति शक्य तितक्या त्वरेने तू सोड. कारण त्या शरीराचा नाश करण्यासाठी मृत्यु संधीची वाट पाहत टपून बसलेले आहे.

जिवा कर्मयोगें जनीं जन्म जाला ।
परी शेवटीं काळमूखीं निमाला ॥
महाथोर ते मृत्यूपंथेंचि गेले ।
कितीएक ते जन्मले आणि मेले ॥१४॥

अनेक जन्माच्या सुकर्मा मुळे या मानव योनीत जन्म घेण्याचें भाग्य तुला लाभलेलें आहे. तरी सुद्धा तुला काळ मृत्यूच्या खाईत लोटल्या शिवाय राहणार नाही. महाथोर अशा लोकांना सुद्धा

मृत्यू ग्रासल्याशिवाय रहात नाही. आजपर्यंत जे जे जन्मले, त्या त्या प्रत्येकाना मृत्यूने गाठलेले आहे. त्याच्या तावडीतून कोणी सुद्धा सुटू शकणार नाही.

मना पाहतां सत्य हें मृत्युभूमी ।
जितां बोलती सर्वही जीव मी मी ।।
चिरंजीव हे सर्वही मानिताती ।
अकस्मात सांडूनियां सर्व जाती ।।१५।।

बा मना, खरें म्हणशील तर जीवंत जगणें ही साक्षात मृत्युभूमि होय. जिवंत असता 'मी मी मोठा' अशा वलगना मानव-प्राणी करीत असतो. आपण मर्त्य म्हणजे मरणारे आहोत याची जाणीव असून सुद्धा प्रत्येक माणूस जणू आपण अमर्त्य-अमर आहोत अशी स्वतःची समजूत करून घेत असतो. परंतु कधीना कधी त्या

प्रत्येकाला काळ गाठीत असतो. या ऐहिक गोष्टी सोडून त्याच्या स्वाधीन होण्या विना गत्यंतर नसतें, बा मना, तू हें पक्के लक्षांत ठेव.

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ।
अकस्मात तोही पुढें जात आहे ॥
पुरेना जनीं लोभ रे क्षोभें त्यातें ।
म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतें ॥१६॥

एखाद्यास मृत्यूने गांठले म्हणजे त्या बद्दल त्याच्या नातेवाईक-मित्र आदीना दारुण दुःख-शोक होत असतो. हे शोक करणारे त्याचे स्नेही-आप्तसुद्धा पुढें मृत्यूस बळी पडतात. असें असली तरी या संसाराची अविट गोडी चाखण्याच्या अखंड हव्यासानें माणूस पूर्णपणें वेडापिसा झालेला असतो आणि हा हव्यास कधीच तृप्त होत नसल्याने

क्षोभ होऊन, तो तृप्त करून घेण्यासाठी मानव-प्राणी पुन्हा पुन्हा जन्म घेऊ लागतो.

मनीं मानव व्यर्थ चिंता वाहातें।
अकस्मात होणार होऊनि जातें॥
घडे भोगणें सर्वही कर्मयोगें।
मतीमंद तें खेद मानी वियोगें॥१७॥

आपल्या प्रारब्ध कर्मानुसार वेळोवेळीं सर्व घटना अटळपणें घडीत असतात. असें असता सुद्धा मानव आपल्या मनांत चिंता करीत बसण्याचें सोडीत नाही. या जन्मी जें जें काही बरें-वाईट भोगावें लागतें, तें तें सर्व काही आपल्या पूर्व-जन्मीच्या कर्मबंधा मुळे होय. या बाबतीत माणसाची मात्रा चालण्या सारखी नाही. असे असलें तरी अल्पमति अजाण लोक या मृत्यूस अतिशय घाबरतात. या मृत्युबाबत अतिशय

दुःख-खेदहि मानतात व त्या पासून दूर पळ-ण्याचा, त्याला चुकविण्याचा अटोकाट प्रयत्न व्यर्थच करून पाहतात.

मना राघवेंवीण आशा नको रे।
मना मानवाची नको कीर्ति तूं रे ॥
जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें।
तया वर्णितां सर्वही श्लाघ्यवाणें ॥१८॥

हे मना, राघव म्हणजे प्रभु श्रीरामा विना कोणाची आशा तू धरू नकोस. त्याच्या शिवाय दुसऱ्या कोणत्याच गोष्टीची आसक्ति बाळगू नको. श्रीरामा विना कोणाबद्दल प्रेम बाळगू नको. श्रीरामा शिवाय कोणाहि मानवाची स्तुति तू गात जाऊ नको. अरे, ज्या श्रीरामाची थोरवी वेदादि, पुराणादि सर्वश्रेष्ठ व महान ग्रंथ सुद्धा मुक्तकंठाने गात असतात, त्या प्रभु श्रीरामाची

तू सुद्धा स्तुति करीत जा. म्हणजे तुझ्या जन्माचें खरोखरीच सोनें होऊन जाईल.

मना सर्वथा सत्य सांडूं नको रे।
मना सर्वथा मिथ्य मांडूं नको रे॥
मना सत्य तें सत्य वाचे वदावें।
मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें॥१९॥

बा मना, सत्य म्हणजे जें परब्रह्म त्याची कांस तू कधीच सोडू नको आणि मिथ्य म्हणजे माया तिचा नाद तू सोडून टाक. तिचा पाठपुरावा करणें तू सोडून टाक. परब्रह्म हें प्रत्यक्षांत सत्य स्वरूपाचें असल्याने तें कधीच सोडू नको. मोह-माया ही खोटी असल्याने तिचा तू त्याग कर.

बहू हिपुटी होइजे मायपोटीं।
नको रे मना यातना तेचि मोठी॥

निरोधें पचे कोंडिलें गर्भवासीं ।
अधोमूख रे दुःख त्या बाळकासी ॥२०॥

रे मना, आईच्या उदरीं असता गर्भवासांत असणाऱ्या बालकास अनंत त्रास होत असतो. मना, गर्भवासांतील या यातना अतिशय असह्य असतात. निरोधें म्हणजे चोहोंबाजने गर्भांतील बालक कोंडला जातो आणि गर्भां त तो बटाटचा सारखा उकडला जातो. अधोमुख अवस्थेंत गर्भांतून बाहेर येत असता बालकास अनंत यातना होत असतात,

मना वासना चूकवीं येरझारा ।
मना कामना सांडि रे द्रव्यदारा ।।
मना यातना थोर हे गर्भवासीं ।
मना सज्जना भेटवीं राघवासी ॥२१॥

म्हणून बा मना, तू ऐहिक सुखाचा उपभोग घेण्याची वासना सोडून टाक. म्हणजे जन्म व त्या

नंतर मृत्यु अशा क्रमाने चालणारा जन्म-मरणाचा अत्यंत दुःख देणारा फेरा तुला चुकेल. बायका मुलें यांच्यावरीस सांसारिक आसक्ति व पैसा मिळविण्याची तीव्र अभिलाषा या मायावी आसक्ति तू पूर्णपणें सोडल्या पाहिजेस. गर्भवासाच्या असह्याह्य यातनातून कायमची सुटका करून घ्यावयाची असल्यास बा मना, गर्भवासांत असल्या पासून राघवाची म्हणजे प्रभु श्रीरामाची भेट घेण्याचा अहर्निश प्रयत्न तू करीत रहा. गर्भ-वासांत असल्यापासूनच श्रीरामाचें नामस्मरण, चिंतन तू करीत रहा. म्हणजे पुढें श्रीरामाचें तुला दर्शन होईल व जन्म--मरणाच्या फेऱ्यातून तुझी सुटका होईल.

मना सज्जना हीत माझें करावें।
रघूनायका दृढ चित्तीं धरावें ॥

महाराज तो स्वामि वायूसुताचा ।
जना उद्धरी नाथ लोकत्रयाचा ॥२२॥

बा सज्जन मना, तुझेंच नव्हे तर त्या बरोबर माझें सुद्धा हित व्हावें म्हणून रघुनायकास म्हणजे प्रभु श्रीरामास तू दृढ भावनेने भजत जा. त्याचें अखंड नामस्मरण दृढ चित्ताने तू करीत जा. कारण महाबलाढ्य अशा श्रीमारुतीरायाचें अत्यंत आवडीचें आराध्य दैवत म्हणून जो श्रीराम सुप्रसिद्ध आहे, जो पृथ्वी, स्वर्ग व नरक या तिन्ही लोकांचा राजा व उद्धारकर्ता आहे, जो या तिन्ही जगतांतील लोकांचा उद्धारकर्ता आहे, तुला सुद्धा जन्ममरणाच्या फेऱ्यांतून बाजूस करून तो उद्धारील. म्हणून तू त्याला शरण जा.

न बोलें मना राघवेंवीण कांहीं ।
जनीं वाउगें बोलतां सूख नाहीं ॥

घडीनें घडी काळ आयुष्य नेतो।
देहांतीं तुला कोण सोडूं पहातो ।।२३।।

चारचौघांत बाजारगप्पा मारीत बसण्या पेक्षा हा वायफळ वेळ तू श्रीरामाच्या चिंतनात घालवीत जा श्रीरामाच्या नामोच्चारास तू अग्रक्रम व सर्वात जास्ती महत्व दे. श्रीरामनामाचा जप तू जेवढया जास्ती प्रमाणांत करशील तेवढा तुला अधिक फायदा होईल. क्षणा-क्षणाने तुझे आयुष्य कमी-कमी होत चाललेलें आहे. म्हणून तू काळ वाया न घालविता तो श्रीरामाच्या मननांत घालव. एकदा का मृत्यु येऊन थडकला म्हणजे तो तुला ग्रासणार व मग तुझी जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून सुटका होणें अशक्य आहे. म्हणून तू श्रीरामाच्या भक्तीस अविलंब प्रारंभ कर.

रघूनायकावीण वायां शिणावें।
जनासारिखें व्यर्थ कां वोसणावें ॥
सदा सर्वदा नाम वाचें वसों दे।
अहंता मनीं पापिणी ते नसों दे ॥२४॥

प्रभु श्रीरामाचें परम पवित्र नामस्मरण करण्या ऐवजी, लोकाना जे जें आवडतें, जें जें रुचतें तें तें बाष्कळपणें बरळत हिंडण्यात व्यर्थपणें शक्ति व काळ यांचा अपव्यय करण्यात काय हाशील आहे असें तुला वाटतें ? स्वत:च्या कर्तृत्वाबद्दल जो फाजील व खोटा गर्व तुला जडलेला आहे, त्या पासून जन्ममरणाच्या फेऱ्यात गुंतवून ठेवणारा पापकर्मबंध निर्माण होत असतो. म्हणून ही गर्वाची अहंप्रवृत्ति सोडून टाक आणि सदा सर्वकाळ अत्यंत मनोभावें परमपवित्र श्रीराम-नामाच्या जपाचा निदिध्यास तू घे.

मना वीट मानूं नको बोलण्याचा ।
पुढें मागुता राम जोडेल कैंचा ।।
सुखाची घडी लोटतां सूख आहे ।
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे ।।२५।।

अरे बा मना,प्रभु श्रीरामाचें नामस्मरण करण्याचा त्याच्या परम पवित्र नामाचें उच्चारण करण्याचा कंटाळा तू कधीच करू नको. असें केल्याने श्रीराम तुला पावणार नाही व जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून तुझी कधी सुटका होणार नाही, हें पक्कें लक्ष्यात ठेव. सुखा-समाधानांत आयुष्य घालविण्यांत आयुष्य सर्वस्व मानण्याची तुझी हीन प्रवृत्ति तू टाकून दे. हें सुखाचें मायाजाळ क्षणिक व मायावी असून तें अल्पकाळ टिकतें. म्हणून खरें व अक्षय सुख देणाऱ्या श्रीरामाची तू **कांस धर.**

देहेरक्षणाकारणें यत्न केला ।
परी शेवटीं काळ घेऊनि गेला ।।
करीं रे मना भक्ति या राघवाची ।
पुढें अंतरीं सोडि चिंता भवाची ।।२६।।

बा मना, मृत्यु पासून तुझें शरीर बचावावें म्हणून तू अतोनात खटाटोप चालविलेस तरी शेवटीं तुझें शरीर मृत्यूच्या भक्षस्थानी पडल्या शिवाय कदापि राहणार नाही. म्हणून रे मना, श्रीरामाची काया-वाचा-मनें करून तू त्याची भक्ति कर व संसारी जीवनाची आस्था व त्याची चिंता करण्याचें सोडू लाग, म्हणजे श्रीरामाच्या भक्तीत मन पूर्णपणें तल्लीन होऊ लागल.

भवाच्या भयें काय भीतोस लंडी ।
धरीं रे मना धीर धाकासि सांडीं ।।

रघूनायकासारिखा स्वामि शीरीं ।
नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥२७॥

हे भित्र्या मना, संसाराच्या, मायेच्या भयानें उरीं धडक भरून घेऊ नकोस. मनांत धीर धर व आत्मविश्वास बाळग. कारण प्रभु श्रीरामा सारख्या महासामर्थ्यवान दैवताच्या कृपा-अनुग्रहाचें भरभक्कम छत्र तुझ्या डोईवर असता तुला कोणत्याच गोष्टीची काळजी वा भयाचे कारण नाही. तू श्रीरामाचा भक्त असल्यास प्रत्यक्ष दंडधारी यम जरी कोपाविष्ठ होऊन तुझ्यांवर चाल करून आला तरी तुला घाबरण्याचें तिळमात्र सुद्धा कारण नाही. कारण श्रीराम तुझें सर्वतोपरीने संरक्षण करण्यास समर्थ आहे.

दिनानाथ हा राम कोदंडधारी ।
पुढें देखतां काळ पोटीं थरारी ॥

मना वाक्य नेमस्त हें सत्य मानीं ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥२८॥

असहाय्याचा संरक्षक व हातांत कोदंड म्हणजे धनुष्य घेतलेल्या प्रभु श्रीरामास सामोरें पाहिलें म्हणजे मृत्युस्वरूप कळीकाळाची सुद्धा पांचावर धारण बसते. आपल्या भक्तांचा अभिमानी व संरक्षक म्हणून ज्या रामास 'दासाभिमानी' असें पालुपद लावलें जातें, तो प्रभु श्रीराम आपल्या भक्तांची कधीच उपेक्षा करीत नाही. आपल्या भक्तांचे सर्वतोपरीने सरक्षण करण्यास तो कधीच चुकत नाही. हें त्रिकालाबाधित सत्य आहे, अशी खात्री तू बाळगली पाहिजेस.

पदीं राघवाचे सदा ब्रीद गाजे ।
बळें भक्तरीपूशिरीं कांबि वाजे ॥
पुरी वाहिली सर्व जेणें विमानीं ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥२९॥

भक्तांचें सर्वतोपरीनें संरक्षण व त्यांचीं जन्म-मरणाच्या फेऱ्यातून कायमची मुक्तता करण्याचें व्रत प्रभु श्रीरामाने घेतलेलें आहे याची दृढ-निश्चयी ग्वाही प्रभु श्रीरामाच्या पायांतील तोडे सुस्पष्ठ व गंभीर अशा झणात्काराने देत असतात. त्याच्या भक्तांच्या शत्रूंचा कपाळमोक्ष करून भक्तांचें संरक्षण करण्यासाठी प्रभु श्रीरामाच्या हातांतील धनुष्य शत्रूच्या डोक्यावर प्रहार करण्यासाठी सदैव सिद्ध आहे. ज्या प्रभु श्रीराम-चंद्राने अयोध्या नगरींतील सर्व लोकाना मुक्ति देऊन त्या सर्वांना आपल्या समवेत विमानातून सदेह स्वर्गास नेले, तो श्रीराम तुझें सुद्धा सर्व-तोपरीने संरक्षण करून तुझ्या मनास अक्षय सुशांति देऊन जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून तुझी कायमची मुक्तता करू शकेल, हें निश्चितपणें तू समजावून घे आणि त्याच्या भक्तीस आरंभ कर.

समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळीं कोण आहे ।।
जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३०।।

सर्व श्रेष्ठ सामर्थ्य ज्याच्याजवळ विपुल प्रमाणात उपलब्ध आहे, असा प्रभु श्रीराम आपल्या भक्तांच्या जवळ वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांची गय कधी सुद्धा करीत नाही. म्हणून त्याच्या भक्ताजवळ वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाची बरें छाती होईल? ज्याच्या पराक्रमाची व सामर्थ्याची स्तुति पृथ्वी आणि पातालातच काय अपितु खुद्द स्वर्ग लोकांत सुद्धा मुक्त कंठाने केली जाते, तो श्रीराम आपल्या भक्तांचें संरक्षण केल्या-शिवाय कदापि गप्प बसत नाही.

महासंकटीं सोडिले देव जेणें ।
प्रतापें बळें आगळा सर्वगूणें ।।
जयातें स्मरे शैलजा शूलपाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३१।।

देवाना सुद्धा अजिक्य ठरलेल्या रावणाचा ज्यानें निःपात केला, तो प्रभु श्रीराम सामर्थ्यांत तर सर्वश्रेष्ठ ठरतोच, त्याजबरोबर सर्व सद्‌गुणांत सुद्धा तो सर्वश्रेष्ठ आहे म्हणून तर प्रत्यक्ष श्रीशंकर व पार्वती त्याचें नामस्मरण करीत असतात. अशा महाश्रेष्ठ व परम पवित्र प्रभु श्रीरामचंद्राची तू सुद्धा मनोभावें भक्ति करीत जा.

अहल्या शिळा राघवें मुक्त केली ।
पदीं लागतां दिव्य होऊनि गेली ।।
जया वर्णितां शीणली वेदवाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३२।।

पति शापाने दगड होऊन पडलेली अहिल्या प्रभु श्रीरामचंद्राच्या पवित्र अशा पायांचा स्पर्श होताच तिचा उद्धार होऊन तिचें मानवांत पुन्हा रूपांतर होण्याची आश्चर्यकारक घटना घडून आली. प्रभु श्रीरामचंद्राच्या पवित्र महिम्याचें मुक्तकंठाने गुणगान करता करता सर्वश्रेष्ठ व महान ग्रंथ जो वेद, तो सुद्धा थकून जातो. अशा महामहात्म्यवान प्रभु श्रीरामाची स्तुति तू सुद्धा मनोभावें केली पाहिजेस.

वसे मेरुमांदार हे सृष्टिलीळा।
शशी सूर्य तारांगणें मेघमाळा ॥
चिरंजीव केले जनीं दास दोन्ही।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥३३॥

मेरु व मांदारादि महाप्रचंड असे महापर्वत सृष्टि-लीलेच्या स्वरुपांत अजरामर होऊन राहीलेले

असून ते जो पर्यंत अस्तित्वांत राहतील, जो पर्यंत सूर्य, तारे व हवा, आकाश आदि अस्तित्वांत रहा-तील तो पर्यंत म्हणजे ज्यास कधीच अंत नाही अशा काळापर्यंत प्रभु श्रीरामाने आपले दोन भक्त श्रीमारुती व बिभिषण अजरामर व चिरं-जीव करून ठेवलेले आहेत याला कारण हे दोघे अतिशय निष्ठेने प्रभु श्रीरामाची तनमनधनाने अनन्यसाधारण अशी भक्ति करीत होते. अशीच श्रीरामाने कृपा करावी म्हणून तू सुद्धा त्याची मनोभावे भक्ति करीत जा.

उपेक्षा कदा रामरूपीं असेना।
जिवां मानवां निश्चयो तो वसेना।।
शिरीं भार वाहेन बोले पुराणीं।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३४।।

आपल्या भक्तांची कोणत्याहि सबबी खाली उपेक्षा करावयाची नाही व कोणत्याहि परिस्थितींत

आपल्या भक्ताच्या मनोकामना पूर्ण करावयाच्या या कार्यासाठी श्रीरामाने हा सर्वश्रेष्ठ अवतार धारण केलेला आहे. परंतु त्याच्या बाबतीत चंचल मनाच्या मानवाचा निश्चय व श्रद्धा दृढ होत नाही, अशा लोकांच्या बाबतीत तो तरी बिचारा काय करू शकेल ? 'आपल्या भक्तांचा सर्व भार निश्चयें करून मी माझ्या शिरी वाहिल्या शिवाय कदापि राहणार नाही' अशी ग्वाही श्रीरामाने पुराणाद्वारें देऊन ठेवली आहे असा प्रभु श्रीराम तुझी उपेक्षा करेल व तुझी भक्ति कुचकामाची ठरेल अशी शंका जरा सुद्धा तू मनात आणू नकोस.

असे हो जया अंतरीं भाव जैसा ।
वसे हो तया अंतरीं देव तैसा ।।
अनन्यास रक्षीतसे चापपाणी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३५।।

जशी मनातली भक्तिभावना असेल त्या प्रमाणांत दैवताचा अनुग्रह लाभतो. त्याच प्रमाणें अत्यंत मनोभावें दृढ श्रद्धेनें जो त्याची भक्ति करतो त्या सर्वांचे रक्षण, जो सदा हातीं धनुष्य धरतो असा श्रीराम कधीहि केल्याशिवाय रहात नाही. म्हणून बा मना, तू सुद्धा त्याचा श्रेष्ठ असा भक्त हो.

सदा सर्वदा देव सन्नीध आहे ।
कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ।।
सुखानंद आनंद कैवल्यदानी ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३६।।

देव सदासर्वदा आमच्या समवेत असला तरी भक्ताच्या श्रद्धेची कसोटी घेतल्या शिवाय तो त्याच्यावर कृपा कधीच करीत नाही, हें साहजीकच होय. जो शाश्वत सुखाचा चिरंतर आनंद देतो, जो स्वतःच निर्भेळ, निष्पाप व शाश्वत स्वरूपाच्या

आनंद स्वरूपातच व्यक्त झालेला आहे, जो जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून मोक्ष म्हणजे कायमची सोडवणूक देतो, असा प्रभु श्रीराम आपल्या अस्सल भक्तास कधीच विसरत नाही.

सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा ।
उडी घालितो संकटीं स्वामी तैसा ।।
हरीभक्तिचा घाव गाजे निशाणीं ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।३७।।

चक्रवाक पक्षाच्या नरमादीचा वियोग ज्याप्रमाणें घालविण्याचे कार्य सूर्य पार पाडीत असतो, त्याचप्रमाणें संसारतापाने पोळलेल्या भक्तास अगर संकटात सापडलेल्या भक्तास प्रभु श्रीराम अत्यंत तत्परतेने सोडवितो. अशा प्रकारे प्रभु भक्तीचे महात्म्य असून प्रभु श्रीराम आपल्या भक्ताचें तत्परतेने संरक्षण करतो.

मना प्रार्थना तूजला येक आहे ।
रघूराज थक्कीत होऊनि पाहे ।।
अवज्ञा कदा हो यदर्थी न कीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।३८।।

बा मना, तुला कळकळीची सूचना अशी की प्रभु श्रीरामाकडे अत्यंत श्रद्धेने तू पहा. या बाबतीत तू चालढकल करू नकोस. प्रभु श्रीरामाच्या भक्तीत तू पूर्णपणें तल्लीन होऊन जा. श्रीरामाचें स्वरूप तुझ्या हृदयात साठव.

जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें ।
जयाचेनि योगें समाधान बाणें ।।
तयालागिं हें सर्व चांचल्य दीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।।३९।।

वेद, शास्त्रें, पुराणें हे सर्वश्रेष्ठ ग्रंथ सुद्धा ज्या श्रीरामाचा महिमा अहमिकेने सांगत असतात, ज्या

श्रीरामाच्या भक्तीने शांति व समाधान लाभतें, त्या प्रभु श्रीरामाच्या चरणीं तुझी चंचल व धरसोड वृत्ती तू सोडली पाहिजेस आणि आपल्या मनांत प्रभु श्रीरामाच्या मूर्तीचें अखंड ध्यान करीत राहिलें पाहिजेस.

मना पाविजे सर्वही सूख जेथें ।
अती आदरें ठेविजे लक्ष तेथें ॥
विवेकें कुडी कल्पना पालटीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥४०॥

अरे मना, ज्या ठिकाणी सर्व प्रकारची शाश्वत सुखें अखंडितपणें सहज प्राप्त होऊ शकतात, अशा परमपवित्र श्रीरामरूपाकडे तुझें सर्व लक्ष्य केंद्रित कर. कुडीकल्पना म्हणजे द्वैत भावना अथवा दैवत व भक्त हे भिन्न भिन्न पातळीचे व त्यांचें सम्मेलन होऊ शकत नाही ही खोटी भावना तू

सारासार विचाराने समजावून घे व सोडून टाकून 'मी म्हणजेच प्रभु श्रीराम ! आम्ही दोघे भिन्न नाही' ही अद्वैत भावना तू विवेकाने स्वीकार म्हणजे प्रभु श्रीरामाचा अनुग्रह तुला जरूर लाभेल.

बहू हिंडतां सौख्य होणार नाहीं ।
शिणावें परी नातुडे हीत कांहीं ॥
विचारें बरें अंतरा बोधवीजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥४१॥

आपणास मुक्ति मिळावी म्हणून चंचलपणें अनेक दैवतें पालथी घालण्याने तुला काहीच सापडणार नाही. उलट या गोष्टीचा तुला विट येऊ लागेल. यांत तुझें कोणत्याहि प्रकारें कल्याण होणार नाही. म्हणून ही धरसोड वृत्ति सोडून प्रभु श्रीराम हें एकमेव सर्वश्रेष्ठ दैवत आहे अशी भावना मनांत

दृढ कर आणि त्याचा अनुग्रह मिळवून तुझें सर्वतोपरीने कल्याण करून घे.

बहुतांपरी हेंचि आतां धरावें ।
रघूनायका आपुलेसें करावें ॥
दिनानाथ हें तोडरीं ब्रीद गाजे ।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ॥४२॥

तू वाट्टेल तेवढ्या गोष्टी अगिकारल्यास तरी प्रभु श्रीरामास तू श्रद्धेने आपलेसें करण्याची, त्याची भक्ति करण्याची एक गोष्ट सर्वांत महत्वाची आहे आणि दृढ निश्चयाने तू तिचा स्वीकार कर. कारण आपल्या भक्तांचें सर्वतोपरीने हीत करण्याचें व सर्वतोपरीने त्याचें संरक्षण करण्याचें व्रतच ज्या श्रीरामाने घेतलेलें आहे, त्या श्रीरामाची भक्ति केल्या शिवाय तू राहू नकोस. भक्तांचे संरक्षण करण्याची जणू हमी देण्यासाठी श्रीराम आपल्या पायातील तोडे ठणकाऊन वाजवीत असतो

मना सज्जना येक जीवीं धरावें ।
जनीं आपुलें हीत तूवां करावें ॥
रघूनायकावीण बोलों नको हो ।
सदा मानसीं तो निधिध्यास राहो ॥४३॥

माणसाने जन्मास येऊन आपला जन्म सार्थकी लावावयाचा असल्यास तू आपलें हित करून घे. परमार्थ साधना म्हणजेच तुझें हित होय हें तू समजावून घे. ही परमार्थ साधना म्हणजे श्रीरामाच्या नामस्मरणाचा अखंडपणें जप करीत राहणें ही होय. श्रीरामनाम जप सदासर्वकाळ करीत राहण्याचा अहर्निश निधिध्यास तू स्वतःस लावून घेतला पाहिजेस.

मना रे जनीं मौन मुद्रा धरावी ।
कथा आदरें राघवाची करावी ॥

नसे राम तें धाम सोडूनि द्यावें।
सुखालागिं आरण्य सेवीत जावें ॥४४॥

मना, वायफळ गोष्टींची वटवट करीत बसण्याचें तू सोड. चारचौघांत तू अगदी मोजकेच बोलत जा. घरीं, दारीं, एकांती, चारचौघांत श्रीरामाचें गुणगान व त्याचा महिमा तू गात जा. ज्या ज्या ठिकाणीं श्रीराम भक्तीचें अस्तित्व नाही, तेथे तेथें तू जाऊ नको. श्रीराम भक्तीस प्रतिरोध होईल, अशा कोणत्याच ठिकाणीं तू जाऊ नकोस. येवढेच काय श्रीराम भक्तीस सुलभता व एकाग्रता लाभावी म्हणून शेवटीं तू अरण्यांत जाऊन राहीलास तर फारच उत्तम होईस बरे का!

जयाचेनि संगें समाधान भंगें।
अहंता अकस्मात येऊनि लागे ॥

तये संगतीची जनीं कोण गोडी ।
जिये संगतीनें मती राम सोडी ॥४५॥

मनांची शांति व समाधान ज्याच्या संगतीमुळे भंग पावून क्षोभ होतो अशी बाब, ज्याच्या मुळे घमेंड, गर्व चढून अंगी उर्मटपणा येतो अशी बाब, ज्या कारणामूळे श्रीराम भक्तीत व्यत्त्यय येऊ लागतो अशा सर्व गोष्टींची सामान्य माणसाना फार गोडी असते. म्हणून काही तू या गोष्टींच्या तिळमात्र आहारी जाऊ नकोस बरें का !

मना जे घडी राघवेंवीण गेली ।
जनीं आपुली ते तुवां हानि केली ॥
रघूनायकावीण तो शीण आहे ।
जनीं दक्ष तो लक्ष लावूनि पाहे.॥४६॥

श्रीरामाच्या नामस्मरणाविना जी घटका जाईल ती फुकट गेली व त्यामुळे आपल्या आयुष्याचें नुकसान होतें अशी भावना तू बाळगली पाहिजेस. श्रीरामनामस्मरणा वाचून केलेलें कोणतेंहि काम व्यर्थ, वायफळ काथ्याकूट आहे असें तू दृढपणें मानलें पाहिजेस. या सर्व गोष्टी सूज्ञ लोकास त्वरित उमगतात. मना तू सुद्धा सूज्ञ असून पक्के-पणें ही गोष्ट तू समजावून घ

मनीं लोचनीं श्रीहरी तोचि पाहे ।
जनीं जाणता भक्त होऊनि राहे ॥
गुणीं प्रीति राखे क्रमू साधनाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥४७॥

ध्यानीं, मनीं, जळीं, स्थळीं, पाषाणीं सर्वत्र श्रीरामाचें अस्तित्व जो पाहू लागतो, जो शोधू लागतो आणि अशा प्रकारें श्रीराम भक्तिमय

अशा प्रकारचें जीवन जो कंठू लागतो असा माणूस सर्वत्र सर्वश्रेष्ठ म्हणून गणला जाऊ लागतो. अशा प्रकारें श्रीरामाची सगुण भक्ति करणारा भक्त सर्वश्रेष्ठ ठरून तो आपलें आयुष्य धन्य व पावन करून घेतो यात वाद नाही.

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा ।
सदा रामनामें वदे नित्य वाचा ।।
स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४८।।

ज्याचा देह देवभक्ति म्हणजे श्रीराम भक्ति प्रित्यर्थ श्रमला, झिजला, ज्याच्या तोंडी सदा-कदा श्रीरामनामाचा जप चालू असतो, जो आपल्या धर्माने घालून दिलेल्या नैतिक आचार-संहितेचें पालन यथायोग्यपणें करीत असतो आणि

संत-सज्जन लोकानी घालून दिलेल्या वागण्याच्या नियमा प्रमाणें जो आपलें वर्तन उत्तम प्रकारचें ठेवतो, तो श्रीरामाचा भक्त या जगांत सर्वश्रेष्ठ आदर्श मानव ठरतो.

सदा बोलण्यासारिखें चालताहे ।
अनेकीं सदा एक देवासि पाहे ।।
सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४९।।

जो आपला दिलेला शब्द मोडत नाही, जो जसें बोलतो त्या बरहुकूम आपलें वागणें प्रामाणिक-पणाचें ठेवतो, जो अनेक देवतापैकी मुख्य आराध्य दैवत जो प्रभु श्रीराम याची मनोंभावें भक्ति करतो, जो आपल्या आराध्य दैवताची सगुण म्हणजे व्यक्तिपूजा करतो आणि सगुण पूजा करणें हें सर्वथैव रास्त आहे अशी शंका विरहित दृढ

श्रद्धा मनांत बाळगतो, तो भक्त सर्वश्रेष्ठ मानव होय.

नसे अंतरीं कामकारी विकारी ।
उदासीन जो तापसी ब्रम्हचारी ।।
निवाला मनीं लेश नाहीं तमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५०।।

नाना विकार म्हणजे नाना कर्मास जो कारणीभूत होतो, अशा कामवासनेपासून जो अलिप्त राहीलेला आहे, जो ऐहिक सुखांच्या बाबतीत उदासीन बनलेला आहे, कामवासना शमविण्याच्या बाबतीत जो संयमपूर्वक निग्रह पाळतो म्हणजे ब्रम्हचार्यव्रताची निष्ठापूर्वक पाळवणूक करतो, जो तमो गुणा पासून अलिप्त राहून सत्व गुणाच्या पूर्ण आहारी जाऊन श्रेष्ठ प्रकारचें अध्यात्मिक समा-

धान प्राप्त करून घेतो, अशी व्यक्ति सर्वश्रेष्ठ आदर्श मानव बनते.

मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धि ।
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी ॥
सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥५१॥

दुसऱ्याचा हेवा करणे, द्वेष करणें, घमेंड करणें, गुर्मी करणें, मग्रुरीने वागणें आणि अप्पलपोटे-पणाने दुसऱ्याचें लुबाडणें अशी स्वार्थी वृत्ति इत्यादी गोष्टी ज्याने संयमपूर्वक सोडून टाकल्या आहेत, ज्याने प्रपंच सोडलेला आहे म्हणजे ज्याने ब्रम्हचार्याश्रम स्वीकारलेला असून सांसारिक तापा पासून जो मुक्त आहे, जो सदा अत्यंत विनयाची प्रासादिक व प्रेमळपणाची भाषा बोलतो, असा श्रीरामभक्त असावा. तसा तो असल्यास सर्वश्रेष्ठ मानव ठरल्यास आश्चर्य नाही.

क्रमी वेळ जो तत्वचिंतानुवादें ।
न लिंपे कदा दंभ वादें विवादें ।।
करी सूखसंवाद जो ऊगमाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५२।।

'तत्वमसि' म्हणजे परमात्मा व जीव हे भिन्न नसून एकच आहेत या महान सिद्धांतावर जो आस्थापूर्वक विश्वास ठेवतो आणि या सिद्धांताची महान समाजांतील सर्वांना समजावून सांगतो, जो वाद-विवाद व वितंडवाद या पासून पूर्णपणे अलिप्त असतो, जो भोंदूगिरीचा तिरस्कर्ता असून समाजांत ती माजू देत नाही, जगाच्या निर्मात्या-बद्दल जो चांगलें बोलतो व त्याची स्तुति करतो, असा श्रीराम भक्त सर्वश्रेष्ठ ठरेल.

सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं ।
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ।।

न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५३।।

सदासर्वदा सर्वांशीं जो खेळीमेळीने वागतो व त्यामुळे जो सर्वांना अतिशय हवाहवासा वाटतो, जो सदासर्वदा कधीहि खोटें बोलत नाही व सत्यवचनी असतो, जो अत्यंत विवेकबुद्धीचा असून आपलें प्रत्येक वागणें विवेकी बुद्धिप्रमाण्यानुसार ठेवण्याचा कटाक्षपूर्वक प्रयत्न करतो, जो निश्चयपूर्वक फक्त सत्य तेवढेंच बोलतो व कटाक्षपूर्वक खोटें बोलणें टाळतो, अशी व्यक्ति एक सर्वश्रेष्ठ मानव असून हे गुण अस्सल श्रीराम भक्तांत सामावलेले असतात.

सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं ।
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं ।।

चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५४।।

जो आपला तारुण्यातील महत्वाचा काल संयम-पूर्वक एकांतांत घालवितो, जो कल्पनांचा गोंधळ न माजविता विवेकाने वागतो, एकदा केलेला निश्चय दृढपणें निग्रहपूर्वक शेवट पर्यंत जो पाळतो, तो श्रीरामाचा भक्त जगांत सर्वश्रेष्ठ ठरतो. म्हणून तूहि असेच वागणें ठेव,

नसे मानसीं नष्ट आशा दुराशा।
वसे अंतरीं प्रेमपाशा पिपाशा ।।
ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।५५।।

जो मनांत दुष्ट प्रकारच्या वासना ठेवत नाही, जो स्वार्थी वासनेने पछाडलेला नाही, ज्याच्या

मनांत ईश्वराबद्दल नितांत प्रेम आहे आणि ज्याच्या मनांत भगवत्प्रेमाची तीव्र तहान लागलेली आहे, ज्याने येवढी निदिध्यासपूर्वक श्रेष्ठ व उत्कृष्ठ भक्ति केल्या मुळे ज्याच्याबद्दल खुद्द देवाला सुद्धा उपकार, ऋण वाटू लागतें, असा देवभक्त सर्वश्रेष्ठ आदर्श मानव ठरतो.

दिनाचा दयाळू मनाचा मवाळू ।
स्नेहाळू कृपाळू जनीं दासपाळू ॥
तया अंतरीं क्रोध संताप कैंचा ।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥५६॥

गोरगरीबांचा दाता, मनाने अत्यंत कोमल व मायाळू, अतिशय प्रेमळ, अत्यंत विनयशील पण परोपकार करण्यात तत्पर, आपल्या लोकांचा संरक्षक, अशा लोकांच्या मनांत क्रोधास तिळमात्र जागा नसते, असे लोक क्रोध जिंकतात. असे लोक

श्रेष्ठ असे भक्त ठरतात व आपल्या आचरणाने श्रीरामभक्ताचें आदर्श वागणें जगापुढे ठेवतात.

जगीं होइजे धन्य या रामनामें।
क्रिया भक्ति ऊपासना नित्य नेमें ॥
उदासीनता तत्वता सार आहे।
सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ॥५७॥

श्रीरामनाम निष्ठेने एकसतत घेत राहिल्यास असा मानव धन्य होतो. आपल्या आचरणांत उच्च आदर्श निष्ठेने बाणवण्याचा जो दररोज प्रयत्न करतो, जो उपासना व भक्ति करीत राहण्याचा नित्य नेम निष्ठेने पाळतो व उदासीनता म्हणजे निष्काम कर्माची, म्हणजे फलाची अपेक्षा न करता आपलें कर्तव्य करीत राहण्याचें तत्व ज्यास उमग-लेलें असून तें सुखी व आदर्श जीवनाचें सार

सर्वस्व आहे असें जो मानतो, अशाची वृत्ति व त्याचें वागणें साहजिकपणें मनमोकळें सरळ, सुस्पष्ठ व सच्चेंपणाचें असल्यास नवल नव्हे.

नको वासना वीषयीं वृत्तिरूपें ।
पदार्थीं जडे कामना पूर्वपापें ॥
सदा राम निष्काम चिंतीत जावा ।
मना कल्पनालेश तोही नसावा ॥५८॥

निष्काम कर्मवादा बाबत आस्था नसली म्हणजे माणसास जेंथें तेथें वासना जडू लागते. व त्यांची वृत्ति सुखलोलूप होऊ लागते. गत जन्मींच्या पापकर्मबंधा मुळे या जन्मीं जगांतील नश्वर व क्षणभंगूर पदार्थावर माणूस आसक्ति, आशा, वासना ठेऊन राहू लागतो. म्हणून या सर्व जंजाळातून सुटण्यासाठी फलाशा विरहित व निर्व्याजपणें प्रभु श्रीरामाची भक्ति तू करीत जा.

कामवृत्ती व फलाशा युक्त स्वार्थी वृत्ति तू सोडली पाहिजेस.

मना कल्पना कल्पितां कल्पकोटी ।
नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी ॥
मनीं कामना राम नाहीं जयाला ।
अती आदरें प्रीति नाहीं तयाला ॥५९॥

श्रीरामाची भेट व्हावी व त्याचा अनुग्रह व्हावा म्हणून तू वाटेल तेवढे प्रयत्न केलेस तरी ते व्यर्थ आहेत. ज्याच्या मनांत कामना म्हणजे वासना, फलाशा आहे, त्याला श्रीराम कधींच पावणार नाही त्याने श्रीरामा बद्दल वाटेल तेवढा आदर दाखविला व वाटेल तेवढी त्याची भक्ति केली तरी त्याच्या मनांत खरी रामभक्ति व खरें राम प्रेम निर्माण होणार नाही व त्याला श्रीराम पावणार नाही. म्हणून निष्काम कर्म करण्याचें

व निष्काम श्रीरामभक्ति करण्याचें व्रत तू निष्ठेनें घे.

मना राम कल्पतरू कामधेनू ।
निधी सार चिंतामणी काय वानूं ॥
जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता ।
तया साम्यता कायसी कोण आतां ॥६०॥

ज्या प्रभु श्रीरामाच्या कृपेमुळे यच्चावत गोष्टी त्याच्या भक्ताना प्राप्त होतात त्या श्रीरामास कल्पतरू म्हणावें कीं कामधेनू म्हणावें की चितेल तें उपलब्ध करून देणारा चिंतामणि म्हणावें ? बा मना, कल्पतरु, कामधेनु, चिंतामणि याहि अलौकीक वस्तूच्याहि पेक्षा श्रीरामाचें कतृत्व व योग्यता सहस्त्रपटीने श्रेष्ठ असल्याने या वस्तूंची उपमा श्रीरामास देणें उचित ठरणार नाही. येवढी श्रीरामाची सर्वश्रेष्ठ पात्रता आहे. म्हणून तू त्यालाच भजत जा.

उभा कल्पवृक्षातळीं दुःख वाहे ।
तया अंतरीं सर्वदा तेंचि आहे ॥
जनीं सज्जनीं वाद हा वाढवावा ।
पुढें मागुता शोक जीवीं धरावा ॥६१॥

श्रीरामरूपीं कल्पवृक्षा खाली म्हणजे श्रीराम सन्निध असता सुद्धा एखादा अविवेकी माणूस त्याच्या भक्तिबाबत कानाडोळा करीत असेल तर अशा माणसास प्रभु श्रीरामाच्या कृपेचा लाभ होत नाही व परिणामी त्याच्या यातना व हाल वाढत जातात. श्रीरामाच्या अलौकिकत्वा बद्दल शंकाकुशंका काढून श्रीरामास जो अनेक पर्याय शोधू लागतो, अशा माणसास परिणामी दुःख व संकटपरंपरा सोसाव्या लागतात. यास श्रीरामाचा काय दोष बरें ?

निजध्यास तो सर्व तूटोनि गेला ।
बळें अंतरीं शोक संताप ठेला ॥
सुखानंद आनंद भेदें बुडाला ।
मनीं निश्चयो सर्व खेदें उडाला ॥६२॥

श्रीरामाबद्दल शंकाकुशंका व विकल्प काढणाऱ्याचें सर्व लक्ष्य धरसोड वृत्तीचें होतें. त्यामुळे श्रीरामाबद्दल या लोकाना बिल्कुल कळकळ वाटत नाही. त्यामुळे अशा व्यक्तीच्या जीवनांत दुःख, खेद, इर्षा, संताप या गोष्टी ठाण मांडूनबसतात श्रीराम व इतर दैवतें असा भेदाचा घोळ घालीत बसण्याने मन कोणत्याच दैवताच्या बाबतीत एकाग्र होत नाही. त्यामुळे सुख-समाधान व शांति या गोष्टी त्याला दुर्मिळ होतात. मन प्रक्षोभक व अशांत असल्यामुळे अशा माणसाचा आत्मविश्वास गळू लागतो.

घरीं कामधेनू पुढें ताक मागे ।
हरीबोध सांडूनि वीवाद लागे ॥

करीं सार चिंतामणी काचखंडे ।
तया मागतां देत आहे उदंडें ।।६३।।

प्रभु श्रीरामासारखी कामधेनु घरीं असता सुद्धा त्याकडे दुर्लक्ष्य करून शांति-समाधान व मुक्ति रूपी ताक दारोदार वृथा मागणारा निव्वळ मूढ म्हणावा. श्रीरामाचा अनुग्रह मिळविण्या ऐवजी वितंडवाद घालणाऱ्यास शुद्ध मूर्खात काढलें पाहिजे. एखाद्यास चिंतामणि मिळाला व त्याच्याकडे उत्तमोत्तम गोष्टी मागण्या ऐवजी एखादी व्यक्ति त्याच्याकडे काचेचे खडे मागू लागली तर ते मिळतील पण मागणाऱ्यास त्याचा फायदा बिलकूल नाही. त्याच प्रमाणें श्रीराम भक्ति न करता भलत्याच गोष्टी करीत बसण्याने आत्मघात होतो.

अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना ।
अती काम त्या राम चित्तीं वसेना ।।

अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा ।
अती विषयी सर्वदा दैन्यवाणा ॥६४॥

अति अज्ञानी माणसास विवेक नसतो. त्यामुळे त्याची वुद्धि सदा धरसोड व चंचल असावयाचीच. ज्या माणसास अति कामवासना आहे, अशा माणसाच्या मनांत श्रीरामाबद्दल कधी भक्ति-भावना निर्माण होणार नाही. ज्या माणसाची वृत्ति अति लोभी असते, अशाची वृत्ति साहजीकच प्रक्षोभक असावयाचीच. अति कामवासना असणाऱ्या माणसास अनत हालअपेष्टा भोगाव्या लागतात.

नको दैनवाणें जिणें भाक्त ऊणें ।
अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दूणें ॥
धरीं रे मना आदरें प्रीति रामीं ।
नको वासना हेमधामीं विरामीं ॥६५॥

भक्ति विना भक्तासपणें जीवन घालविलें म्हणजे जीवनांत अनंत हालअपेष्ठाना तोंड द्यावें लागतें. अविवेकाने वागणाऱ्या माणसास सदैव दुष्ट दुःख भोगावे लागतेच. म्हणून बा मना, तू श्रीरामाची मनोभावें भक्ति करीत जा. म्हणजे या दुःख व हालअपेष्ठा यांतून तुझी कायमची सुटका होईल. ज्या ठिकाणी श्रीरामनामास पूर्णविराम दिला जातो असें एखादें घर अगर राजवाडा की ज्यांत ऐश्वर्य सुख-समृद्धीची मोठ्या प्रमाणांत रेलचेल आहे, असें घर लाभलें तरी तू तें स्वीकारू नको. कारण परिणामी त्यापासून तुझें अनहीत आहे.

नव्हे सार संसार हा घोर आहे ।
मना सज्जना सत्य शोधूनि पाहें ।।
जनीं वीष खातां पुढें सूख कैचें ।
करी रे मना ध्यान या राघवाचे ।।६६।।

संसार म्हणजे मानवी जीवनाचें सार सर्वस्व होय अशी तुझी वृथा कल्पना असून ती सर्वथैव चुकीची होय. हें त्रिकालाबाधित सत्य तू नीटपणें समजावून घे. या संसारातील क्षणिक सुखानंदात तू तल्लीन होतोस. परंतु या सुखा पाठोपाठ मोठ्या प्रमाणांत दुःखपरंपरा तुला उपभोगाव्या लागतात म्हणून या दुःखपरंपरांतून सुटका होण्यासाठी परमपवित्र प्रभु श्रीरामाची मनोभावें तू भक्ति करीत जा.

घनश्याम हा राम लावण्यरूपी ।
महाधीर गंभीर पूर्णप्रतापी ।।
करी संकटीं सेवकाचा कुडावा ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।६७।।

प्रभु श्रीराम काळसर, निळसर असला तरी त्याचें सौंदर्य व लावण्य अप्रतिम व अवर्णनीय आहे. तो

अत्यंत शांत, संयमी, धीर-गंभीर, परिपूर्ण विवेकी असा चर्येवरून दिसतो. अपितु तो महापराक्रमी असून त्याचें शौर्य सर्वश्रेष्ठ गणलें गेलेलें आहे. संकटात सापडलेल्या भक्ताच्या मदतीस हा कृपाळू राम धावलाच म्हणून समजावें व किती का मोठें संकट असलें तरी त्यातून त्याने आपल्या भक्ताची सुटका केलीच म्हणून समजावी. म्हणून बा मना, श्रीरामाची मानसपूजा तू दररोज प्रातःकाळीं केल्या शिवाय राहू नकोस.

बळें आगळा राम कोदंडधारी।
महाकाळ विक्राळ तोही थरारी ॥
पुढें मानवा किंकरा कोण केवा ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥६८॥

सामर्थ्याच्या बाबतीत सर्वाहून वेगळा परंतु सर्वश्रेष्ठ असा हा हातीं धनुष्य धारण करणारा

श्रीराम आहे महा भयंकर असा काळ-मृत्यु सुद्धा त्याला पाहून थरथर कापतो व त्याच्यापुढें नमतो. अशा महाश्रेष्ठ पराक्रमी श्रीरामापुढे त्याच्या भक्ताची आगळीक करणाऱ्या यकश्चित माणसाची काय पाड लागणार ? म्हणून अशा रक्षणकर्त्या श्रीरामाचे नामस्मरण सकाळच्या वेळीं तू अवश्य करीत जा

सुखानंदकारी निवारी भयातें ।
जनीं भक्तिभावें भजावें तयातें ॥
विवेकें त्यजावा अनाचार हेवा ।
प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥६१॥

शाश्वत व सर्वश्रेष्ठ आत्मिक सुखाचा अविट आनंद देणारा, आपल्या भक्तांचें भय निवारणारा अशा प्रभु श्रीरामास जगांतील सर्व लोकांनी अवश्य भजलें पाहिजे अशिष्ठ वागणें, गैरवर्तन,

पापकर्म व द्वेष, मत्सर आदि मनाचा प्रक्षोभ होणाऱ्या गोष्टी तू विवेकपूर्वक सोडून टाकल्या पाहिजेस प्रभातकाळीं तू श्रीराम चिंतनांत वेळ घालविण्याचा परिपाठ ठेव म्हणजे तुझें अपार कल्याण झाल्या शिवाय राहणार नाही.

सदा रामनामें वदा पूर्णकामें ।
कदा बाधिजेना पदा नित्य नेमें ।।
मदालस्य हा सर्व सोडोनि द्यावा ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७०।।

सद सर्वदा श्रीरामनाम मनोभावें घेतलें तर जादू घडन आल्याप्रमाणें श्रीराम कृपेमुळे सर्वकामें सुरळीत पार पडू लागतात. त्याचें नामस्मरण नित्यनेमाने करीत जा. म्हणजे कोणतीच संकटें येणार नाहीत. आलीच तर त्यातून तुला तारून नेण्यास श्रीराम समर्थ आहे. तू गर्व, घमेंड व गुर्मी या

वृत्तिपासून व आळशीपणापासून पूर्णपणें अलिप्त रहा आणि प्रातःकालीं नित्यनेमें करून प्रभु श्रीरामचंद्राचें नामस्मरण करीत जा.

जयाचेनि नामें महादोष जाती।
जयाचेनि नामें गती पाविजेती॥
जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा।
प्रभाते मनीं राम चींतीत जावा॥७१॥

मोठ्यातले मोठे दोष सुद्धा ज्या श्रीरामाचें नामस्मरण केलें असता दूर सरतात, ज्याच्या नामस्मरणाने अधोगतीचा मार्ग बदलून उत्तम सद्गति लाभून पुढें जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून मुक्ति सुद्धा मिळते, ज्याचें नामस्मरण केलें असता पापसंचय कमी होत जातो व उलट पुण्यसंचय वाढत जातो, अशा परमश्रेष्ठ श्रीरामाचें प्रभात समयीं नित्य नेमाने चिंतन करीत जा.

न वेंचे कदा ग्रंथिचें अर्थ कांहीं ।
मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं ॥
महाघोर संसार शत्रू जिणावा ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥७२॥

श्रीरामाचें नामस्मरण करण्यास एखाद्या गहन ग्रंथातील सारतत्व शोधीत बसण्यासारखें अवघड व दुर्घट कार्य करावें लागत नाही अगर मुखानें श्रीरामनामोच्चार करण्यास कोणत्याच प्रकारचे परिश्रम करावे लागत नाहीत किती बरें सोपा हा श्रीराम नाम घेण्याचा मार्ग? आणि एवढ्या अति सुलभ मार्गाची महाश्रेष्ठ फलप्राप्ती म्हणजे महा भयंकर असे संसाराचे शत्रू विनासायास जिंकले जातात. म्हणून बा मना, तू सुद्धा सकाळच्या शुभ-प्रहरी श्रीरामाचें नामस्मरण करीत जा.

देहेदंडणेचें महादुःख आहे ।
महादुःख तें नाम घेतां न राहे ॥
सदाशीव चिंतीतसे देवदेवा ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥७३॥

तीर्थयात्रा, व्रत-वैकल्यें आदि गोष्टी करण्याच्या-पायीं अनेक कष्ट व यातायाती उपसाव्या लागतात. परंतु मोठ्यातलें मोठें जरी दुःख असलें तरी सहजसुलभ व परमपवित्र श्रीरामनामाच्या उच्चारानें तें पार नाहीसें होतें. अरे बा मना, साक्षात श्रीशंकर सुद्धा ज्या प्रभु श्रीरामाचें मनोभावें नामस्मरण व चिंतन करतो व ज्यास सर्व देवांचा देव समजण्यात येते अशा महाश्रेष्ठ प्रभु श्रीरामाची भक्ति नित्य नेमाने तूंहि करीत जा.

बहुतांपरी संकटें साधनांचीं ।
व्रतें दान उद्यापनें तीं धनाचीं ।।
दिनाचा दयाळू मनीं आठवावा ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ।।७४।।

तीर्थयात्रा, आदि गोष्टी करण्यासाठी बरेच परिश्रम वेचावे लागतात. व्रतवैकल्यें, उद्यापनें आणि अनुष्ठाने बसवावयाची तर बराच पैसा खर्च करावा लागतो. येवढें सर्व करून सुद्धा पुण्य-संचयहि होत नाही अगर मुक्तिहि मिळत नाही. यासाठी अतिशय दयाळू असणाऱ्या श्रीरामाचें सकाळी उठल्यावर नामस्मरण करीत जा. पुण्य संचय करण्याचा सर्वात सोपा, बिन खर्चाचा व बिन यातायातीचा हा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे.

समस्तांमधें सार साचार आहे ।
कळेना तरी सर्व शोधूनि पाहें ।।

जिवा संशयो वाउगा तो त्यजावा ।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥७५॥

श्रीरामाचे नामस्मरण हें सर्वांचें सारसर्वस्व आहे. बा मना, तुला हें पटत नसेल तर महाश्रेष्ठ धर्म-ग्रंथ जो वेद अगर पुराणें अगर संतांचीं वचनें यांचा अभ्यास कर म्हणजे हे सर्व ग्रंथ सुद्धा श्रीराम-नाम सर्वश्रेष्ठ असल्याची मुक्तकंठाने ग्वाही देतील. श्रीराम हाच खरा सर्वश्रेष्ठ की नव्हे असा बाष्कळ व फालतू संशय काढीत न बसता तोच खरा सर्वश्रेष्ठ आहे असा दृढ विश्वास ठेऊन तू दररोज सकाळीं नित्यनेमें करून प्रभु श्रीरामचंद्राचें मनोभावें नामस्मरण करीत जा.

नव्हे कर्म ना धर्म ना योग कांहीं ।
नव्हे भोग ना त्याग ना सांग पाहीं ॥

म्हणे दास विश्वास नामीं धरावा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥७६॥

धर्माचरण करून अगर व्रतादि कर्मे करून अगर योग साधना करून अगर त्याग करून पुण्य संपादन करावें तर या गोष्टी सुद्धा निटपणें व शास्त्र-शुद्धरित्या आपणास करणें जमत नाही. शेवटी श्रीरामनामस्मरणा सारखा पुण्य संपादण्यासाठी सर्वथैव रास्त असा सर्वात सोपा व सर्वात श्रेष्ठ असा दुसरा मार्ग नाही. म्हणून बा मना, तू नीत्य सकाळी श्रीरामचें नामस्मरण करीत जा.

करी काम निष्काम या राघवाचें।
करी रूप स्वरूप सर्वां जिवांचें॥
करी छंद निर्द्वंद हे गूण गातां।
हरीकीर्तनीं वृत्तिविश्वास होतां ॥७७॥

बा मना, अपेक्षा विरहीत अशी निष्काम भक्ति श्रीरामाच्या बाबतीत तू करीत जा. प्रभु श्रीरामाचें स्वरूप तुझ्या मनःपटलावर कायमचें उमटावें म्हणून तू त्याचें अहर्निश चिंतन करीत जा. श्रीराम संकीर्तनावर तू पूर्ण विश्वास ठेऊ लागताच श्रीरामाची वादविवाद विरहीत भक्ति करण्याचा छंद तुला जडेल. श्रीरामनामा वाचून तुला पुढे गमणार नाही.

अहो ज्या नरा रामविश्वास नाहीं ।
तया पामरा बाधिजे सर्व कांहीं ॥
महाराज तो स्वामी कैवल्यदाता ।
वृथा वाहणें देहसंसारचींता ॥७८॥

ज्या माणसाला श्रीराम नामांवर विश्वास नाही, त्याला सर्व प्रकारच्या पीडा व उपद्रव चालू होतात. हा श्रीराम कैवल्यदाता म्हणजे

मुक्तिदाता असता तू तुझ्या संसाराची व तुझ्या जीवनासंबंधी वृथा चिंता का करीत बसतोस ?

मना पावना भावना राघवाची ।
धरी अंतरीं सोडिं चिंता भवाची ।।
भवाची जिवा मानवा भूलि ठेली ।
नसे वस्तुची धारणा व्यर्थ गेलीं ।।७९।।

हें मना, परमपवित्र प्रभु श्रीरामाची भक्ति तू मनापासून करू लाग. संसारात रमण्याचा मोह अवरता घेऊन संसाराचा मोह आटोपशीर कर. मानवास प्रपंचाची आसक्ति निष्कारणच जडते व तो त्यातच मग्न राहतो. हा प्रपंच क्षणभंगूर असल्याने त्यापासून अपार दुःख व यातना भोगाव्या लागतात. म्हणून बा मना, या क्षणभंगूर प्रपंचाचा निधिध्यास सोड व श्रीराम भक्तीचा

निधिध्यास तू स्वतःस लावून घे. म्हणजे या राममक्तिमुळें तुझ्या मनास शांति मिळेल.

धरा श्रीवरा त्या हराअंतरातें ।
तरा दुस्तरा त्या परा सागरातें ॥
सरा वीसरा त्या भरा दुर्भरातें ।
करा नीकरा त्या खरा मत्सरातें ॥८०॥

श्रीशंकराच्या हृदयांत सुद्धा भक्तिमुळे ज्याचा पूर्ण ठसा उमटलेला आहे, अशा परमपवित्र श्रीरामाची मनोभावें भक्ति करीत जा. म्हणजे तरून जाण्यास अतिशय कठीण असलेल्या या संसार-सागरांतून तू लीलया तरून जाशील. ज्याच्या भुकेला अन्न नाही, अशा पोटाच्या अती मागें लागणें सोड. श्रीरामांवर विश्वास न ठेवता त्याचा मत्सर करण्याची वृत्ति गर्दभाप्रमाणें मूढपणाची असून त्याचा तू त्याग कर.

मना मत्सरें नाम सांडूं नको हो ।
अती आदरें हा निजध्यास राहो ॥
समस्तांमधें नाम हें सार आहे ।
दुजी तूळणा तूळितांही न साहे ॥८१॥

श्रीरामाबद्दल भलत्या शंकाकुशंका काढीत बसू नको. कोणत्याच सबबीखाली त्याचें परमपवित्र नामस्मरण सोडू नको, तू अत्यंत आदरपूर्वक त्याचें नामस्मरण करीत राहण्याचा अहर्निश निदिध्यास स्वतःस लावून घेतला पाहिजेस. मानवी जीवनाचें सारसर्वस्व व मानवी जीवनांतील सर्वश्रेष्ठ गोष्ट म्हणजे श्रीरामनाम होय. श्रीरामनामाची तुलना करण्याच्या तुल्यबलाची दुसरी वस्तु उपलब्ध नसल्याने श्रीरामाची कोणाबरोबर तुलना होऊ शकत नाही. येवढें हें श्रीरामनाम परमपवित्र व महाश्रेष्ठ आहे.

बहू नाम या रामनामीं तुळेना ।
अभाग्य नरा पामरा हें कळेना ।।
विषा औषधा घेतलें पार्वतीशें ।
जिवा मानवा किंकरा कोण पूसे ।।८२।।

अनेक प्रकारच्या दैवतांची नांवें उपलब्ध असली तरी श्रीरामनामाची बरोबरी कोणी करू शकत नाही. अभागी व कमनशिबी अशा काही लोकाना ही गोष्ट उमजत नाही व भलत्याच नामस्मरणांत ते मग्न होतात. अरे मना, समुद्रमंथनच्या वेळीं श्रीशंकरास अत्यंत जहाल विष प्राशन करावें लागलें परंतु हें हलाहल पचविण्यासाठी त्याने श्रीरामनाम घेतलें व त्यामुळे त्याला विषसुद्धा पचून गेलें व विषबाधा झाली नाही. प्रत्यक्ष देवास सुद्धा श्रीरामनाम कोणत्याहि संकटांतून हमखास तरून नेऊ शकतें तेथे तें यकश्चित मान-

वास उपकारक व कल्याणप्रदझाल्या शिवाय राहणार नाही.

जेणें जाळिला काम तो राम ध्यातो।
उमेसीं अती आदरें गूण गातो ॥
बहू ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथें।
परी अंतरीं नामविश्वास तेथें ॥८३॥

श्रीशंकराने श्रीरामनामाच्या निधिध्यासाने कामवासनेंवर पूर्ण विजय संपादन केला म्हणून तर अंतःकरणाच्या शुद्ध भक्तीनें व अत्यंत आदराने तो आपली पत्नी पार्वती इच्याकडे श्रीरामाच्या अलौकिक महिम्याचें गुणगान करीत असतो. श्रीशंकर स्वतः अतिशय प्रकांड ज्ञानी विद्वान आहे. त्याचें सामर्थ्य सर्वश्रेष्ठ गणलें गेलेलें आहे. त्याची विरक्त प्रवृत्तिसुद्धा अलौकिक अशी आहे. असा हा श्रीशंकर देव सर्वदृष्टीने सर्वश्रेष्ठ असला

तरी तो अत्यंत मनोभावें श्रीरामाची अद्वितीय भक्ति करीत असतो. म्हणून तू सुद्धा श्रीराम भक्तीचे महात्म्य ओळखून त्याची भक्ति करू लाग.

विठोनें शिरीं वाहिला देवराणा ।
तया अंतरीं ध्यास रे त्यासि नेणा ।।
निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी ।
जिवा सोडवी राम हा अंतकाळीं ।।८४।।

श्रीविठ्ठल हें दैवत एक श्रेष्ठ दैवत समजलें जातें. त्या विठ्ठलाने अत्यंत आदराने श्रीशंकरास आपल्या मस्तकीं म्हणजे डोक्यांवर धारण केलेले आहे. आणि येवढा सर्वश्रेष्ठ शंकरसुद्धा श्रीरामाची अनन्य भावाने भक्ति करतो. अत्यंत क्रोधी व रागीट म्हणून सुप्रसिद्ध असलेला श्रीशंकर श्रीरामनामाने शांत वृत्तीचा बनला. त्याने क्रोध

जिंकला. केवढें हें श्रीरामभक्तीचें महात्म्य? श्रीरामभक्ती मुळेच केवळ मृत्यु नंतर पुन्हा जन्म न होता जन्म मरणाच्या फेऱ्यांतून कायमची सुटका होतें. म्हणून अत्यंत मनोभावें श्रीरामाची तू सुद्धा भक्ति करीत जा.

भजा राम विश्राम योगेश्वरांचा।
जपू नेमिला नेम गौरीहराचा॥
स्वयें नीववी तापसी चंद्रमौळी।
तुम्हां सोडवी राम हा अंतकाळीं॥८५॥

महाश्रेष्ठ योगी जो शंकर हा स्वतः अत्यंत मनोभावें श्रीरामाची भक्ति करीत असतो या श्रीराम भक्तीने श्रीशंकराच्या मनास परिपूर्ण शांति व पूर्ण समाधान लाभलें. म्हणून श्रीशंकर नित्यनेमाने व पूर्ण निश्चयाने श्रीरामाची अत्यंत आदराने भक्ति करतात. तपश्चर्येने जे साध्य

झालें नाही तें श्रीरामनामाने त्याना मिळालें व त्यांचा क्षोभ संपून मन पूर्ण शांत झालें. असा या महात्म्यवान श्रीरामाची तुम्ही सर्वांनी भक्ति करावी. म्हणजे मृत्यु समयीं तो तुम्हा सर्वांची जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमचा सुटका करील.

मुखीं राम विश्राम तेथेंचि आहे ।
सदानंद आनंद सेवूनि राहे ॥
तयावीण तो शीण संदेहकारी ।
निजधाम हें नाम शोकापहारी ॥८६॥

ज्याच्या तोंडीं श्रीरामनाम आहे, त्याच्या मनास निश्चितपणें विश्रांती, शांति व समाधान आहे असें निश्चितपणे समजावें. म्हणून श्रीरामनामाचा जप जेव्हा जेव्हा शक्य असेल तेव्हा तेव्हा करीत जावा. म्हणजे एक अलौकित आनंद व समाधान

लाभेल. श्रीरामनामा वाचून कोणत्याहि गोष्टींच्या भजनी लागू नये. कारण त्यापासून निश्चितता वादातीत राहते व हें सर्व व्यर्थ काथ्याकूट ठरतें. म्हणून फक्त श्रीरामनामच फक्त तू मनोभावें व निष्ठेने घेत जा म्हणजे तुझें दुःख व यातना नाहीशा होऊन शिवाय तुला मोक्ष प्राप्त होईल.

मुखीं राम त्या काम बाधूं शकेना ।
गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना ।।
हरीभक्त तो शक्त कामास मारी ।
जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी ।।८७।।

जो मनोभावें श्रीरामनाम घेतो त्याला कामवासना बाधत नाही. म्हणजे श्रीरामनामामुळे कामवासनेवर पूर्ण विजय मिळून तिच्यापासून होणारे अनर्थ व पापकर्मबंध निर्माण होत नाहीत. श्रीराम-

नामाने वासनेशीं मुकाबला करून तिच्यावर विजय मिळविण्याचें अलौकिक मनोधैर्य राम भक्तास लाभते. त्यामुळे तो कामवासनेवर पूर्ण विजय संपादू शकतो. श्रीरामाच्या भक्तीने व श्रीरामनाम जपानेच केवळ श्रीमारुतीराया हनु-मान यास कामवासनेवर विजय मिळाला व तो अखंड ब्रम्हचारी राहीला. तसाच प्रकारें तू सुद्धा श्रीरामनाम घे. म्हणजे लैंगिक भावनेंवर तू सुद्धा विजय संपादू शकशील.

बहू चांगलें नाम या राघवाचें।
अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ॥
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें।
जिवां मानवां हेंचि कैवल्य साचें ॥८८॥

प्रभु श्रीरामाचें नामस्मरण अत्यंत शुभपूर्ण कल्याणप्रद, व सर्वथैवदृष्टया महाश्रेष्ठ आहे.

यांत वाद नाही. "श्रीराम" हें नांव किती बरें छोटे, किती बरें सोपें, किती बरें मधूर आहे ! तें उच्चारावयास अत्यंत सोपें व बिन यातायातीचें आहे. तें घेतलें म्हणजे संसार दुःखाचें मुळच मुळी समूळ नष्ट होतें. संसार दुःखाचें मूळ म्हणजे वासना. ती नाहीशी करण्यास बिन खर्चाचा व सर्वांत स्वस्त असा हा मार्ग आहे. गरीब मानव-प्राण्यास श्रीरामनाम एक अमोघ व अलौकिक असें वरदान असून मोक्ष-मुक्ति पदरीं पाडवून घेण्याचें तें एकमेव श्रेष्ठ व सोपें साधन आहे. म्हणून तू या श्रीरामाची कास धर.

जनीं भोजनीं नाम वाचे वदावें ।
अती आदरें गद्यघोषें म्हणावें ।।
हरीचिंतनें अन्न सेवीत जावें ।
तरी श्रीहरी पविजेतो स्वभावें ।।८९।।

प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगीं भोजनारंभी श्रीराम नाम अवश्य घेत रहावें. अती आदरपूर्वक श्रीरामाचें नाव मोठ्यानं म्हणावें श्रीरामाचें चिंतन केल्याविना अन्नाचा कण सुद्धा ग्रहण करू नये. असे सदासर्वदा श्रीरामनामस्मरण मोठ्या भक्तिभावानें केलें म्हणजे श्रीराम प्रसन्न होतो,

न ये राम वाणी तया थोर हाणी ।
जनीं व्यर्थ प्राणी तया नाम काणी ॥
हरीनाम हें वेदशास्त्रीं पुराणीं ।
बहू आगळें बोलिली व्यासवाणी ॥९०॥

ज्याच्या तोंडी श्रीरामनाम नाही अशा माणसाची अपरिमित हानी होते, त्याचें अनहीत होतें. श्रीरामनामाचें ज्याला वावडें वाटतें, जो श्रीरामाचें नामस्मरण करीत नाही असा एखादा माणूस असेल तर त्याचा जन्म व्यर्थ गेलेला आहे

असें खुशाल समजावें. श्रीरामनाम सर्वांत श्रेष्ठ आहे अशी सुस्पष्ट ग्वाही वेद, शास्त्रें आदि महत्वाचे ग्रथ सुद्धा देत असतात. महाभारत लिहीणाऱ्या व्यासांनी श्रीरामनामस्मरणाचा अलौकिक असा महिमा गाइलेला आहे. तो फारच हृद्य आहे. तो एकदा ध्यानी घे.

नको वीट मानूं रघूनायकाचा ।
अती आदरें बोलिजे राम वाचा ॥
न वेचे मुखीं सांपडे रे फुकाचा ।
करीं घोष त्या जानकीवल्लभाचा ॥९१॥

श्रीरामाबद्दल कधी सुद्धा तू वीट, कंटाळा मानू नको अती आदराने न मोठ्या प्रेमाने त्याचें नांव घेत जा. श्रीरामनाम घेण्यास काहीच त्रास होत नाही अगर पदरचे पैसे खर्च करावे लागत नाहीत. येवढे करून श्रीरामाची नामस्मरणाने भेट घडून

येवढे करून श्रीरामाची नामस्मरणाने भेट घडून येते. म्हणून श्रीरामाचा जयजयकार तू सारखा करीत जा.

अती आदरें सर्वही नामघोषें ।
गिरीकंदरीं जाइजे दूरि दोषें ॥
हरी तिष्ठतू तोषला नामतोषें ।
विशेषें हरा मानसीं रामपीसें ॥९२॥

अत्यंत आदराने म्हणजे मोठ्या भक्तिभावाने श्रीरामनाम घेतलें म्हणजे दोष व दुःखें दूर होतात. श्रीरामनाम घोषाने श्रीरामास अत्यंत आनंद होतो. श्रीशंकरास सुद्धा श्रीरामनाम घोषाचें जणू वेड लागलेलें आहे. म्हणून तू सुद्धा श्रीरामनामाच्या पाठीमागें लागण्याचे वेड स्वतःस लावून घे.

जगीं पाहतां देव हा अन्नदाता ।
तया लागली तत्वता सार चिंता ॥

तयाचें मुखीं नाम घेतां फुकाचें ।
मना सांग पां रे तुझें काय वेंचे ॥९३॥

जगातील प्रत्येक घटनेचें सूत्र परमेश्वर चालवीत असतो सर्वांचा अन्नदाता व संरक्षणकर्ता तोच आहे. त्याला सर्व काही कळतें व तो प्रत्येकाची सर्वतोपरीने काळजी घेण्यास समर्थ आहे. असें असता कृतज्ञतापूर्वक त्याचें चिंतन व नामस्मरण करण्यात तुझें कोणतें बरें नुकसान आहे? जाता जाता श्रीरामाचें नामस्मरण करणें तुला अगदीं सहजी शक्य आहे.

तिन्ही लोक जाळूं शके कोप येतां ।
निवाला हरू तो मुखें नाम घेतां ॥
जपे आदरें पार्वती विश्वमाता ।
म्हणोनी म्हणा तेंचि हें नाम आतां ॥९४॥

अती राग येताच जो तिसरा डोळा उघडतो व या तिसऱ्या डोळ्याच्या प्रखर तेजाने पृथ्वी, पाताळ व स्वर्ग हे तिन्ही लोक जळून खाक होऊ शकतील, असा महासामर्थ्यवान श्रीशंकर सुद्धा श्रीरामाच्या भजनी लागल्याने शांत प्रवृत्तीचा बनला. अवघ्या विश्वाची माता जी पार्वती, ती सुद्धा अत्यंत मनोभावें व मोठ्या भक्तिभावाने श्रीरामाचें नामस्मरण करीत असते. म्हणून असें महाश्रेष्ठ व परमपवित्र श्रीरामनाम तू सदासर्वदा घेत जा.

अजामेळ पापी वदे पुत्रकामें ।
तया मुक्ति नारायणाचेनि नामें ।।
शुकाकारणें कुंटणी राम वाणी ।
मुखें बोलतां ख्याति जाली पुराणीं ।।९५।।

अजामेळ नांवाचा अतिशय पापी व चांडाळ

ब्राम्हण होता. देवा-धर्माचा तो द्वेष करी. त्याचें आपल्या नारायण मुलांवर फार प्रेम होतें. मरते समयीं 'नारायण, नारायण' असें आपल्या मुलाचें नांव तो सारखें घेऊ लागला. कर्मधर्मसंयोगाने 'नारायण' नांवाच्या मनोभावें उच्चारामुळें अजामेळास मुक्ति मिळाली. त्याचप्रमाणें आपल्या पोपटाचें नांव 'राम' असें ठेऊन पोपटास हाक मारण्याच्या निमित्ताने 'राम' नांव सारखें घेतलें गेल्याने महापापी वेश्या सुद्धा उद्धरली जाऊन तिला मोक्ष मिळाला अशी पुराणांतरीची कथा सर्वश्रुतच आहे. असें असता अत्यंत भक्तिभावाने श्रीरामनामाचें ध्यान करणाऱ्या माणसास मोक्ष न मिळाल्यास नवल होय.

महाभक्त प्रल्हाद हा दैत्यकूळीं ।
जपे रामनामावळी नित्य काळीं ॥

पिता पापरूपी तया देखवेना ।
जनीं दैत्य तो नाम मूखें म्हणेना ।।९६।।

स्कंद पुराणीं वर्णिलेला भक्त प्रल्हाद हिरण्य-कश्यपू सारख्या राक्षसा पित्याच्या पोटीं जन्मास आला. परतु श्रीरामनाम जपाचा त्याने अखंड निधिध्यास घतला होता. मुलाची रामभक्ति हिरण्यकश्यपूस उघड्या डोळ्याने धड पाहवेना, ना धड स्वतःस श्रीरामनाम घेण्याची बुद्धि होईना.

मुखीं नाम नाहीं तया मुक्ति कैची ।
अहंतागुणें यातना ते फुकाची ।।
पुढें अंत येईल तो दैन्यवाणा ।
म्हणोनी म्हणा रे म्हणा देवराणा ।।९७।।

ज्याच्या मुखी श्रीरामनाम नाही त्याला मुक्ति

मिळणार नाही. श्रीरामाबाबत उद्धटपणाच्या दृष्टीने पाहून निष्कारण यातना सोसत खितपत पडावें लागतें व शेवटीं अत्यंत दुःखद रीतीनें मृत्युच्या आहारी जावें लागतें. म्हणून जो देवांचा देव आहे अशा प्रभु श्रीरामाचें नाम-स्मरण करीत जा.

हरिनाम नेमस्त पाषाण तारी ।
बहू तारिले मानवदेहधारी ॥
तया रामनामीं सदा जो विकल्पी ।
वदेना कदा जीव तो पापरूपी ॥९८॥

प्रभु श्रीरामाचें नांव लिहून पाण्यांत टाकलेले दगड सुद्धा समुद्रांत वर वरंगू लागले आणि या तरंगणाऱ्या दगडांचा पूल तयार करून त्यांवरून वानरसेनेने लंकेच्या रावणांवर हल्ला केला, हें सर्वज्ञातच आहे.जेथे दगड तरतात तेथें श्रीरामाच्या

नामाने मानवप्राणी हा दुस्तर संसारसागर अवश्य तरून गेले पाहिजेत. अशा परमपवित्र श्रीराम नामाबाबत जो साशंक अथवा उदासीन राहील अशा माणसास पापी म्हणण्या शिवाय दुसरें गत्यंतर नाही.

जगीं धन्य वाराणसी पुण्यराशी ।
तयेमाजि जातां गती पूर्वजांसी ।।
मुखें रामनामावळी नित्यकाळीं ।
जिवा हीत सांगे सदा चंद्रमाळी ।।९९।।

श्रीक्षेत्र काशी अत्यंत पावन ठिकाण समजले जातें. त्या ठिकाणी जाणारा स्वतः तर उद्धारला जातोच शिवाय त्याच्या पूर्वजांचा, पितरांचा सुद्धा उद्धार होतो कारण तेथें श्रीरामनामाचा अहोरात्र जप केला जातो. हा श्रीरामनाम जपाचा शिरस्ता खुद्द श्रीशंकरानी तेथें घालून दिलेला

असून या श्रीरामनामामुळेच काशीक्षेत्रास पावित्र्य प्राप्त झालेलें आहे.

यथासांग रे कर्म तेंहि घडेना ।
घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना ।।
दया पाहतां सर्वभूतीं असेना ।
फुकाचें मुखीं नाम तेंही वसेना ।।१००।।

माणसाच्या हातून कर्मविधि सुद्धा यथायोग्यपणें पारपाडले जात नाहीत. आणि समजा कर्म घडलें तरी माणसांत ठाण मांडून बसलेल्या वासनेमुळे कर्मापासून उपलब्ध होणारा पुण्यसंचय बारगळला जातो. प्राणीमात्राबद्दल ज्याला दयाबुद्धि नाही आणि विनासायास फुकाफुकी घ्यावयाचें श्रीराम-नाम सुद्धा घेण्याचा ज्याला अळस वाटतो अशा महाभागाना काय म्हणावें ? अशाने पापसंचय

अतोनात वाढून जन्म-मरणाचा अत्यंत दुःखदत फेरा अखंडपणें चालूच राहतो.

जया नावडे नाम त्या येम जाची ।
विकल्पें उठे तर्क त्या नर्क ची ची ॥
म्हणोनी अती आदरें नाम घ्यावें ।
मखें बोलतां दोष जाती स्वभावें ॥१०१॥

श्रीरामनाम ज्यास आवडत नाही अशाना यम यमयातना देण्यासाठी गाठत असतो. श्रीरामनामा बद्दल शंकाकुशंका काढीत बसणाऱ्यांची नरकांत रवानगी केली जाते व त्यांची सर्वत्र अवहेलना होते. म्हणून अत्यंत भक्तिभावनेने श्रीरामनाम घेत जावें. श्रीरामनाम घेतल्याने स्वभावांतील दोष सुद्धा नाहीसे होऊ लागतात. अशी श्रीरामा-नामांत जादू दडलेली आहे.

अती लीनता सर्वभावें स्वभावें ।
जना सज्जनालागिं संतोषवावें ॥
देहे कारणीं सर्व लावीत जावें ।
सगूणीं अती आदरेंसी भजावें ॥१०२॥

सर्व प्राणिमात्रा सोबत अत्यंत विनयाची प्रेमळ-पणाची वागणूक तू द्यावीस. संत-सज्जन लोकाना आवडेल, पसंत पडेल असें वागणें तू ठेवीत जा. आपला देह सत्कारणी लावावा. चांगल्या कामा-साठी सारें जीवन राबवावें. श्रीरामाची सगुण-भक्ति करीत जावी. अशाप्रकारे खऱ्या राम-भक्ताचें आचरण असलें पाहिजे.

हरीकीर्तनें प्रीति रामीं धरावी ।
देहेबुद्धि नीरुपणीं वीसरावी ॥
परद्रव्य आणीक कांता परावी ।
यदर्थीं मना सांडि जीवीं करावी ॥१०३॥

हरिकीर्तनांत सुद्धा श्रीरामभक्तीचा महिमा गावा. श्रीरामाबद्दल येवढी भक्ति हवी कीं श्रीराम-भक्तीचा महिमा सांगता सांगता देहात्मबुद्धि नाहीशी झाली पाहिजे. मी म्हणजेच प्रभु श्रीराम येवढी अत्यंत आपुलकीची भावना निर्माण झाली पाहिजे दुसऱ्याचें धन व दुसऱ्याची बायको यांच्यावर लोभीपणानें दृष्टि ठेवणें तू पूर्णपणें सोडावेस आपणास जें लाभलेलें आहे त्यांतच समाधान मानण्याची वृत्ति तू ठेव.

क्रियेवीण नानापरी बोलिजेतें ।
परी चित्त दुश्चीत तें लाजवीतें ।।
मना कल्पना धीट सैराट धांवे ।
तया मानावा देव कैसेनि पावे ।।१०४।।

नाना प्रकारानें उपदेश पांडित्य गाजविलें व इकडे प्रत्यक्षांत कृतींत कांही नाही असें असेल तर

परोपदेशाची आपली आपणासच लाज वाटू लागते मनास स्वैरपणें कल्पनेचा संचार करू दिला व बोलण्याप्रमाणें आपली कृति नसेल तर प्रभु श्रीराम आपणास कसा काय पावणार ?

विवेकें क्रिया आपुली पालटावी ।
अती आदरें शुद्ध क्रीया धरावी ।।
जनीं बोलण्यासारिखें चाल बापा ।
मना कल्पना सोडिं संसारतापा ।।१०५।।

आपलें आचरण विवेकबुद्धीने आवरून तें चुकीचें असल्यास सुधारावें. अत्यंत सौजन्याने चांगली वागणूक आचरावयास प्रारंभ करावा. आपण चारचौघांत ज्याप्रमाणें शहाजोगपणाच्या गप्पा मारीत असतो, त्याच बरहुकूम आपल्या आचरणांत शहाजोगपणा पूर्णपणें उतरून दाखवावा. संसारतापा संबंधीच्या विचित्र कल्पना

बाळगू नकोस. संसारतापाचा बाऊ माजवू नको.

बरी स्नानसंध्या करी येकनिष्ठा ।
विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा ॥
दया सर्वभूतीं जया मानवाला ।
सदा प्रेमळू भक्तिभावें निवाला ॥१०६॥

प्रभू श्रीरामास वगळून स्नानसंध्यादि आन्हिकात तू आपलें सर्व लक्ष्य केंद्रित केलेलें आहेस. हें विवेकपूर्वक समजावून घे व या गोष्टीपेक्षा श्रीरामनामस्मरणाला महत्व दे. प्राणिमात्राबद्दल ज्याला सहानुभूति व दयाबुद्धि वाटते, जो सर्वांशीं अत्यन्त आपुलकीची व प्रेमळपणाची वागणूक ठेवतो अशा माणसास श्रीरामभक्तिमुळे अक्षय शांति व समाधान लाभते.

मना कोपआरोपणा ते नसावी ।
मना बुद्धि हे साधुसंगीं वसावी ॥

मना नष्ट चांडाळ तो संग त्यागी ।
मना होइ रे मोक्षभागीं विभागी ॥१०७॥

क्रोधाच्या, रागाच्या आहारी जाण्याची तुझी वृत्ति तू अवश्य सोडण्याचा प्रयत्न कर. क्रोध कमी होऊन निवळावा म्हणून तू संत-सज्जन लोकांबरोबर आध्यात्म चिंतनांत, श्रीरामभक्ति करण्यात तू वेळ घालव. बा मना, तू दुष्ट लोकांची संगत कटाक्षपूर्वक सोडून दे. दुष्ट संगतीमुळे वृत्ति दुष्ट बनते व त्यामुळे मोक्ष पारखा होतो. मोक्षप्राप्ती सहज सुलभ व्हावी म्हणून दुष्ट संगती अवश्य टाळली पाहिजे.

मना सर्वदा सज्जनाचेनि योगें ।
क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ॥
क्रियेवीण वाचाळता ते निवारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥१०८॥

संत-सज्जन लोकांच्या संगतीत राहिल्याने आपलें वर्तन सुधारते व शुद्ध होतें शिवाय आपलें मन न कळत भक्ति मार्गाकडे लागते. फुकटचा उपदेश व्यर्थ असून तोंडाने उपदेश करण्याऐवजी आपल्या आचरणांत उपदेश करावयाची गोष्ट प्रत्यक्ष आणून दाखवून मगच उपदेश करावा हें उचित होय. वादविवाद वाढविण्याच्या गप्पा अनिष्ठ होत. यास राजकारण म्हणतात. त्याऐवजी असा सुख-संवाद आयोजित करावा कीं जेणेंकरून सर्व लोकाना विचारविनिमय पटून आनंद वाटेल. यास भक्तिमार्ग म्हणतात. राजकरणाचा मार्ग टाळून भक्तिमार्गाचा तू अवलंब कर.

जनीं वादवेवाद सोडूनि द्यावा ।
जनीं सूखसंवाद सूखें करावा ॥
जनीं तोचि तो शोकसंतापहारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥१०९॥

चारचौघांत वाद-विवाद व हुज्जत घालणें सोडून द्यावें. त्याऐवजी प्रेमाच्या, आपुलकीचो व आपलेपणाची बोलणो करावीत. वितंडवाद सोडल्याने व सहानभूतीच्या बोलण्यामुळे आपलें व सभोवतालच्या लोकांचे सुद्धा दु:ख व क्रोध नाहीसा होतो. म्हणून सर्वांना सुख होईल अशाच प्रकारची बोलणी करावीत.

तुटे वाद संवाद त्यातें म्हणावें ।
विवेकें अहंभाव यातें जिणावें ।।
अहंतागुणें वाद नानाविकारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।११०।।

वाद-विवाद नाहीसा करण्यास कारणीभूत ठरणारा असा सुसवाद हवा. त्यासच संवाद म्हणतात. उमंटपणाने हेकट प्रवृत्तीच्या आहारी जाण्याचें सोडून हेकट व उर्मट वृत्तीस पूर्णपणें

मुरड घातली पाहिजे. उद्धटपणाच्या आहारी गेल्याने वादविवाद मोठ्या प्रमाणांत वाढतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणांत क्षोभ निर्माण होतो व पुढे त्यापासून अनंतयातना होतात. म्हणून बा मना, तुझ्या उग्र 'अहं' प्रवृत्तीस मुरड घाल व सर्वांचें हित होईल व सर्वांचें कल्याण होईल अशा प्रकारचें तुझें वर्तन ठव.

हिताकारणें बोलणें सत्य आहे।
हिताकारणें सर्व शोधूनि पाहें ।।
हिताकारणें बंड पाखांड वारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।१११।।

बा मना, तुला तुझें हित करून घ्यावयाचें असेल तर तू खोट्या गोष्टींचा नाद सोडून सत्य गोष्टीचीच कांस धरली पाहिजेस. कल्याणप्रद गोष्टी पदरी पडाव्यात म्हणून तू अशा गोष्टींचा

मागोवा घेत गेले पाहिजेस. अतिरेकी पुरोगामी वृत्ति व वितंडवादी नास्तिकपणा या गोष्टी तू टाळल्या पाहिजेस तर तुझें कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. तू अशा गोष्टी बोलत जा कीं ज्यामुळे वादविवाद नेस्तनाबूत होऊन सर्वत्र प्रमाचें व आनंदाचें वातावरण निर्माण होत जाईल.

जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला।
परी वादवेवाद तैसाचि ठेला॥
उठे संशयो वाद हा दंभधारी।
तुटे वाद संवाद तो हितकारी॥११२॥

'वाद विवाद वर्ज करावा' असा सर्वच जण हितोपदेश करीत असतात. परंतु येवढा उपदेश ऐकून सुद्धा पुन्हा जर उर्मटवृत्ति व विवादी प्रवृत्ति वाढीस लागली म्हणजे उपदेश फुकट

वाया गेला म्हणायचा! वादविवादीवृत्ति खरोखरीच मारक व विनाशकारी आहे की नाही असा वृथा संशय न घेता सर्वांना रुचेल व विवादांवर पांघरूण पडेल असेच संभाषण तू केलें पाहिजेस.

जनीं हीत पंडीत सांडीत गेले।
अहंतागुणें ब्रम्हराक्षस जाले ॥
तयाहूनि व्युत्पन्न तो कोण आहे।
मना सर्व जाणीव सांडूनि राहें ॥११३॥

महाश्रेष्ठ असे विद्वान देखील आपल्या हिताचा व कल्याणाचा मार्ग सोडून वाद-विवादासाठी आपली विद्वता पणास लावण्याच्या उद्योगास लागतात. त्यामुळें मृत्युनंतर त्याना भूतश्रेणींतील ब्रह्मराक्षसाचें स्वरुप प्राप्त होते. या वाद-विवादाच्या आहारी गेलेल्या माणसाचा संपूर्ण

विनाश झाल्याशिवाय कदापि रहात नाही म्हणून बा मना, तू वितंडवादीवृत्ति पूर्णपणें त्यागून टाक.

फुकाचें मुखी बोलतां काय वेंचे ।
दिसेंदीस अभ्यंतरीं गर्व सांचे ॥
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।
विचारें तुझा तूंचि शोधूनि पाहें ॥११४॥

परउपदेशपांडित्य दाखविणें, लोकाना उपदेश करणें सोपें आहे. परंतु यामुळे ढोंग व दांभिकपणा वाढीस लागतो आणि त्यापायीं अंगांत पोकळ घमेंड येऊ लागतें. म्हणून दांभिक उपदेश करण्याचें सोंग घेणें तू सोड. जी गोष्ट उपदेशावयाची आहे ती तू प्रथम तुझ्या अंगी उत्तम रीतीने उतरवून दाखव. मग आपल्या आचरणांतील प्रत्यक्ष आदर्श दाखवून त्याचा उपदेश करीत जा.

म्हणजे सर्वांना तो पटेल व त्याचें अनुकरण होऊ लागेल. या गोष्टी विवेकपूर्वक तू अंगीं बाणव व त्यांचा अनुभव कसा काय येतो तें पहा.

तुटे वाद संवाद तेथें करावा ।
विवेकें अहंभाव हा पालटावा ॥
जनीं बोलण्यासारिखें आचरावें ।
क्रियापालटें भक्तिपंथेंचि जावें ॥११५॥

तुझ्या उपदेशामुळे वाद विवाद मिटले पाहिजेत. त्यासाठी तू अहंभाव म्हणजे 'मी' पणाची वृत्ति सोड म्हणजे तुझ्या अंगीं लीनता बाणेल व त्यामुळे प्रथम तुझीच वादविवादी वृत्ति नष्ट होईल. आपण जसे लोकांनी वागावें अशी अपेक्षा धरतो, त्याप्रमाणेंच प्रथम स्वतः तसें वर्तन ठेवलें पाहिजे नाहीं तर लोकांकडून आपेक्षित वागण्याची अभिलाषा करणें व्यर्थ ठरणार नाहीं का? तू श्रीराम-

भक्ति मार्गाचा निष्ठेने अवलंब कर. म्हणजें तुझें आचरण शुद्ध व पवित्र होऊं लागेल.

बहू श्रापितां कष्टला अंबऋषी।
तयाचे स्वयें श्रीहरी जन्म सोशी॥
दिल्हा क्षीरसिंधू तया ऊपमानीं।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥११६॥

निमंत्रित दुर्वास ऋषि भोजनास वेळीच न आल्याने अंबरीष राजाने भोजन केलें हें पाहून दुर्वासाना राग येऊन त्यानी अंबरीषास वाईट शाप दिला. तेव्हा आपल्या भक्ताचें रक्षण करावें म्हणून विष्णूने अंबरीषाचें रक्षण करण्यासाठी अवतार घेतला. त्याचप्रमाणें पीठाचे पाणी दूध म्हणून पिणाऱ्या उपमन्यूने खऱ्या दूधाची चव कळताच खऱ्या दुधासाठी हट्ट धरला असता त्याच्या आईने भगवंताची उपासनाभक्ति केली

व त्यामुळे उपमन्युस भगवंतानी दुधाचा समुद्र दिला. अशाच प्रकारें मोठ्या प्रेमाने अंतःकरण-पूर्वक भक्ति केली असता त्या भक्तीचें फळ भगवत कधीहि दिल्या शिवाय रहात नाही.

धुरू लेंकरूं बापुडें दैन्यवाणें ।
कृपा भाकितां दीधली भेटि जेणें ॥
चिरंजीव तारांगणीं प्रेमखाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥११७॥

गरीब बिचारा छोटा बालक ध्रुव ! सावत्र आईने त्याच्या वडिलाच्या मांडी वरून हाकून लावताच बिचाऱ्या केविलवाण्या ध्रुव बालकाने अढळ पद मिळावें म्हणून उपासनाभक्ति चालू केली. तेव्हा श्रीविष्णु प्रसन्न झाले व त्यानी बाळ ध्रुवास आकाशांतील ताऱ्यांत अढळ म्हणजे ज्या ठिकाणा-हून कोणी हलवू शकणार नाही असें कायमचें

चिरस्थिर पद बहाल केले. अशाच प्रकारें परमेश्वर आपल्या भक्तानें केलेली मागणी कधीहि पूर्ण केल्याशिवाय रहात नाही.

गजेंद्र महासंकटीं वाट पाहे ।
तयाकारणें श्रीहरी धांवताहे ॥
उडी घातली जाहला जीवदानी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥११८॥

सरोवरांत जल-क्रिडा करण्याकरीता गेलेला असता तेथील सुसरीनें गजेंद्राचा पाय पकडला व त्याला पाण्यांत ओढण्यास प्रारंभ केला. तेव्हां गजेंद्राने विष्णूचा धावा चालू केला. गजेंद्र हा श्रीविष्णूचा कट्टर भक्त असल्यानें श्रीविष्णु गरूडावर बसून गजेंद्राकडे धावले व त्यानी गजेंद्राची संकटांतून सुटका केली. अशा प्रकारें श्रीविष्णूनी गजेंद्रास जिवदान दिलें. या उदाहरणावरून या गोष्टीची

सदैव खात्री बाळगावी कीं परमेश्वर आपल्या भक्तास संकटातून सोडविल्याशिवाय रहात नाही.

अजामेळ पापी तया अंत आला ।
कृपाळूपणें तो जनीं मुक्त केला ॥
अनाथासि आधार हा चक्रपाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥११९॥

अजामेळा सारख्या महापापी माणसाने अंतकाळी आपल्या मुलाच्या नांवाचा उच्चार केल्यामुळे तें नांव नारायणाचें असल्याने देवाने त्याला जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून सोडविलें तद्वतच हा परमेश्वर अत्यंत दयाळू असून संकटांत असलेल्या भक्तास कधीहि सोडविल्याशिवाय रहात नाही. म्हणून तो भक्तांचा एकमेव आधार ठरल्यास नवल नाही.

विधीकारणें जाहला मत्स्य वेगीं ।
धरी कूर्मरूपें धरा पृष्ठभागीं ॥
जना रक्षणाकारणें नीच योनी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥१२०॥

विधी म्हणजे ब्रह्मदेव, त्याचें संरक्षण करण्यासाठी सुद्द देवाला मत्स्यावतार घ्यावा लागलेला होता. पृथ्वी समुद्रांत बुडू नये म्हणून सुद्धा देवाने कूर्मावतार घेतलेला आहे आणि पृथ्वीला आपल्या पाठींवर घेऊन पृथ्वीचें संरक्षण केलें भक्तांच्या रक्षणासाठी देवाने वराह म्हणजें डुक्कराच्या अवतारा सारखा हीन अवतार पण धारण केलेला आहे. ज्या देवाच्या दयाळूपणास सीमाच नाही, असा देव आपल्या भक्ताने बोलविल्यास त्याच्या मदतीस गेल्या शिवाय कदापि रहात नाही.

महाभक्त प्रल्हाद हा कष्टवीला ।
म्हणोनी तयाकारणें सिंह जाला ॥
न ये ज्वाळ वीशाळ सन्नीध कोण्ही ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥१२१॥

प्रल्हाद हा नारायणाचा एक मोठा भक्त होता. तो दुष्ट बापाच्या जाचास कंटाळून गेला होता. भक्त प्रल्हाद अशा प्रकारें संकटांत आहे असें पाहून त्याला या जाचांतून सोडविण्यासाठी देवाने नरसिंहाचा अवतार धारण करून तो खांबांतून प्रगट झाला असता अत्यंत राग व द्वेष आल्याने त्याच्या डोळ्यांतून अतिशय भयंकर अशा विस्तवाच्या ज्वाला बाहेर पडू लागल्या. त्यामुळें त्याच्याजवळ जाणें कोणास पण शक्य होईना. अशाच प्रकारें आपल्या भक्तास संकटांतून सोडविण्यासाठी देव मोठ्या तत्परपणे यशस्वी खटपट करीत असतो.

कृपा भाकितां जाहला वज्रपाणी ।
तयाकारणें वामनू चक्रपाणी ॥
द्विजांकारणें भार्गवू चापपाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥१२२॥

वज्रपाणी म्हणजे देवांचा राजा जो इंद्र जेव्हा संकटांत सापडला व देवाचा धावा करू लागला, तेव्हा देवाने वामन अवतार धारण केला व तो इंद्राच्या मदतीस धाऊन गेला. त्याचप्रमाणें एका ब्राम्हण भक्ताच्या रक्षणासाठी त्याने परशुरामाचा अवतार धारण केला आहे. अशा प्रकारें देव आपल्या भक्ताला संकटांतून कधीहि वाचविल्याशिवाय रहात नाही.

अहिल्येसतीलागि आरण्यपंथें ।
कुडावा पुढें देव बंदीं तयांतें ॥

बळें सोडितां घाव घाली निशाणीं ।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥१२३॥

पतिशापाने दगड होऊन पडलेल्या अहिल्येचा उद्धार करून तिला श्रीरामाने मानवी रूप प्राप्त करून दिले आपल्या सामर्थ्याच्या जोरावर प्रभु श्रीरामान रावणाने कैद करून ठेवलेल्या देवांची सुटका केली अशा या अलौकिक कृत्यामुळे ज्या प्रभु श्रीरामाच्या महिम्याची कीर्ति सर्वत्र पसरू लागली, असा प्रभु श्रीराम आपल्या भक्तांची उपेक्षा कधीच करीत नाही.

तये द्रौपदीकारणें लागवेगें ।
त्वरें धांवतो सर्व सांडूनि मार्गें ॥
कळीलागि जाला असे बौद्ध मौनी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥१२४॥

द्रौपदीच्या अब्रूरक्षणासाठी तिच्या सहाय्यार्थ श्रीकृष्ण धाऊन गेले व त्यानी तिचें रक्षण केले. परमेश्वराने कलीयुगांत मौन धारण करणाऱ्या बुद्धाचा अवतार धारण केलेला आहे अशा प्रकारें देव आपल्या भक्ताच्या मदतीस कधीहि धावून गेल्याशिवाय रहात नाही.

अनाथां दिनांकारणें जन्मताहे ।
कलंकी पुढें देव होणार आहे ॥
जया वर्णितां सीणली वेदवाणी ।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ॥१२५॥

अशाचप्रकारें अडचणींत संकटांत सापडलेल्या आपल्या भक्तांचें सर्वतोपरीने रक्षण करण्यासाठी वेळोवेळीं कित्येकदा परमेश्वराने अनेक अवतार धारण केलेले असून त्याने समर्थपणें आपल्या भक्तांचीं संकटें निवारलेलीं आहेत. वेदासारखे

महान व सर्वश्रेष्ठ ग्रंथ सुद्धा देवाच्या अवतारांचीं भरगच्च वर्णनें मोठ्या प्रमाणांत करीत असतात. असा हा देव आपल्या भक्तांचें सर्वतोपरीने संरक्षण करतो यात शंका कोणती ?

जनाकारणें देव लीलावतारी ।
बहूतांपरी आदरें वेषधारी ॥
तया नेणती ते जन पापरूपी ।
दुरात्मे महानष्ट चांडाळ पापी ॥१२६॥

भक्तांच्या व सज्जन लोकांच्या संरक्षणासाठी देव नाही नाही तीं कृत्यें करतो. नाना स्वरुपांत प्रगट होतो. असें असता सुद्धा जे लोक त्याचें पवित्र महात्म्य दुर्लक्षितात व त्याची भक्ति करीत नाहीत अशा करंट्या, पापी, चांडाळ लोकाना काय म्हणावे ? ते कृतघ्न व दुरात्मे होत.

जगीं धन्य तो रामसूखें निवाला ।
कथा ऐकतां सर्व तल्लीन झाला ।।
देहेभावना रामबोधें उडाली ।
मनोवासना रामरूपीं बुडाली ।।१२७।।

प्रभु श्रीरामाची भक्ति करून त्यापासून आत्मिक आनंद व अक्षय शांति जो मिळवितो असा भक्त धन्य होय. प्रभु श्रीरामाच्या लीला ऐकण्यात जो रंगतो असा रामभक्त सुद्धा धन्य मानावा. 'हा माझा देह व मी देहाचा' ही देहात्मभावना श्रीरामाच्या भक्तीने समूळ नष्ट होते. मन श्रीरामभक्तींत तल्लीन व तादात्म्य पावू लागले म्हणजे वासना, कामप्रवृत्तिसुद्धा समूळ नष्ट होते.

मना वासना वासुदेवीं वसों दे ।
मना कामना कामसंगीं नसों दे ।।

मना कल्पना वाउगी ते न कीजे ।
मना सज्जना सज्जनीं वस्ति कीजे ॥१२८॥

बा मना, तुला श्रीरामभक्तीस लागावयाचें असल्यास प्रथम तुझी वासना वृत्ति वासुदेवाचरणीं तुला सोडावी लागेल त्याचप्रमाणें लोभी व अभिलाषी वृत्ति व कामी वृत्ति तू सोडली पाहिजेस व तुझी वृत्ति पूर्णपणें निष्काम, निरपेक्ष व निरिच्छ बनली पाहिजे. त्याचप्रमाणें वेड्यावाकड्या कल्पनेच्या स्वैर भराऱ्या मारण्याची तुझी चंचलवृत्ति सुद्धा तू सोडली पाहिजेस. या सद्वृत्ति अंगीं बाणाव्यात म्हणून बा मना, तू सदासर्वदा सत्संगांत, साधु-संत लोकांत वावरत जा.

गतीकारणें संगती सज्जनाची ।
मती पालटे सूमती दुर्जनाची ॥

रतीनायिकेचा पती नष्ट आहे।
म्हणोनी मनातीत होऊनि राहें ॥१२९॥

साधु-संतांची संगत केल्याने माणूस चांगल्या कर्मगतीस लागतो संत-सज्जन लोकांच्या संगती पायी चांडाळ, दुर्जनास सुद्धा त्याची नीच-कुबुद्धि सपुष्टांत येऊन त्यास सुबुद्धि प्राप्त होते. कामवासनेचा स्वामी जो मदन, तो वृत्तोने अतिशय नष्ट-दुष्ट आहे त्याचा प्रादुर्भाव तुला होऊ नये असे वाटत असेल तर तू मनातीत म्हणजे निर्विकार वृत्ति अंगीं बाणवली पाहिजेस.

मना अल्प संकल्प तोहि नसावा।
सदा सत्यसंकल्प चित्तीं वसावा॥
जनीं जल्प वीकल्प तोहि त्यजावा।
रमाकांत येकांतकाळी भजावा॥१३०॥

मना, मायेचा पापकर्मबंध वाढविणारा संकल्प तू

कधीहि यत्किंचित सुद्धा करू नको. तर सत्य गोष्टींची जोपासना करण्याचा सत्यसंकल्प तू नेहमी करीत जा. निरनिराळ्या दैवता संबंधी वाद-विवाद विकल्प व मतभेद यांचें जगात काहूर माजलेलें आढळतें. हे वैचारिक मतभेद सुद्धा तू बाजूस सारले पाहिजेस. श्रीराम हेंच एकमेव सर्वश्रेष्ठ दैवत होय असा दृढ विश्वास ठेऊन तू त्याची नियमितपणें भक्ति करीत जा आणि एकांतात नियमितपणें त्याचें भजन करीत जा.

भजाया जनीं पाहतां राम येकू ।
करीं बाण येकू मुखीं शब्द येकू ॥
क्रिया पाहतां उद्धरे सर्व लोकू ।
धरा जानकीनायकाचा विवेकू ॥१३१॥

तसें पाहू गेल्यास या जगांत सर्व दृष्टीने श्रेष्ठ असें एकमेव दैवत श्रीराम हेंच असून तो आपला

शब्द बदलत नाही अगर आपल्या भक्ताचें कल्याण करावयाचा बाणा सोडीत नाही. त्याची अलौकिक कृत्यें पाहून व ऐकून कोणाचाहि उद्धार होऊ शकेल. अशा श्रीरामाची भक्ति करण्याचा मार्ग विवेकपूर्वक तू पटवून घेतला पाहिजेस. श्रीराम हेच एकमेव सर्वश्रेष्ठ दैवत होय असा दृढ विश्वास ठेऊन तू त्याची नियमितपणें भक्ति करीत जा आणि एकांतात त्याचें भजन करीत जा.

विचारूनि बोले विवंचूनि चाले ।
तयाचेनि संतप्त तेही निवाले ॥
बरें शोधिल्यावीण बोलों नको हो ।
जनीं चालणें शुद्ध नेमस्त राहो ॥१३२॥

सारासार विचार केल्याशिवाय बोलू नये. त्याचप्रमाणें योजकपणें आपलें आचरण ठेवावें. अशा प्रकारचें वागणें असणाऱ्या लोकांचा संतापी स्वभाव सुद्धा शांत होतो. उत्तम-उत्तम गोष्टींची

कास धरण्याचा तू एकसतत प्रयत्न केला पाहि-जेस चारचौघांत तुझी वागणूक सच्चेपणाची सचोटीची, शुद्ध व सभ्यपणाची असली पाहिजे.

हरीभक्त वीरक्त विज्ञानराशी ।।
जेणें मानसीं स्थापिले निश्चयाशी ।।
तया दर्शन स्पर्शनें पुण्य जोडे ।
तया भाषणें नष्ट संदेह मोडे ।।१३३।।

हरिभक्त त्यागी वृत्तीचा असून तो स्वतः ज्ञानी पण असतो. शिवाय कोणत्याहि गोष्टीत निश्चय पूर्वक वागण्याची सवय ज्याने मनाला लावून घेतलेली आहे, अशा माणसाच्या दर्शनाने व अशा लोकांच्या पादस्पर्शाने सुद्धा पुण्याचा साठा होतो. अशा लोकांशी विचारविनियम केला म्हणजे शकाकुशंका नष्ट होतात. म्हणून अशा लोकांचा सहवास लाभावा म्हणून तू खास प्रयत्न कर.

नसे गर्व आंगीं सदा वीतरागी ।
क्षमाशांति भोगी दयादक्ष योगी ॥
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा ।
इहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा ॥१३४॥

ज्याला घमेंड गर्व यांचा लवलेश सुद्धा नाही आणि जो अतिशय विनयी आहे, जो स्वार्थत्यागी व भोगत्यागी आहे, जो अतिशय शांत व संयमी असून ज्याला क्षमा करण्याची उदात्त वृत्ति जड-लेली आहे असा, जो अतिशय दयाळू आहे जो अष्टांगयोगविद्या जाणतो, ज्याला लोभ-लालसा बिल्कुल नाही, ज्याला भावनांचा उद्रेक होत नाही, आणि ज्याला दैन्य जडलेलें नसून सदासर्वदा जो आनंदी व समाधानी वृत्तीचा असतो, ही सर्व लक्षणें ज्याच्या अंगीं आहेत अशी व्यक्ति योगीराज ठरते. श्रीरामाच्या भक्तांत सुद्धा हे गुण असणें आवश्यक आहे.

धरीं रे मना संगती सज्जनाची ।
जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची ॥
बळें भाव सद्‌बुद्धि सन्मार्ग लागे ।
महाक्रूर तो काळ विक्राळ भंगे ॥१३५॥

ज्याच्या संगतीने दुर्जन माणसाची वृत्तिसुद्धा चांगली होऊ लागते, ज्याच्या संगतीने जाता-जाता सुद्धा बुद्धीस चांगलें वळण लागून माणूस सन्मार्गास लागतो, ज्या लोकांच्या वास्त्यावाऱ्यास सुद्धा महाक्रूर काळ जात नाही, अशा सज्जन लोकांची संगत करीत जा आणि अशा लोकांच्या सहवासांत जास्तीतजास्त वेळ काढण्याचा प्रयत्न कर. म्हणजे तुझी सुद्धा वृत्ति सज्जनाची होईल.

भयें व्यापिलें सर्व ब्रह्मांड आहे ।
भयातीत तें संत आनंत पाहें ॥

जया पाहतां द्वैत कांहीं दिसेना ।
भय मानसीं सर्वथाही असेना ॥१३६॥

मानवप्राणी मर्त्य असल्याने या जगांतील प्रत्येक माणूस भयाने पछाडलेला आहे. असें असता सुद्धा संत-सज्जन लोक कर्मबंधमुक्त असल्यान त्याना मुक्ति मिळणार असल्याने साहजीकपणें त्याना मृत्यूचें भय बिल्कूल वाटत नाही. संसार-सुखाचें स्वरूपच मुळी द्वैतमय असते. संत-सज्जन लोकाना संसार लालसा नसल्याने 'मी आणि परका' ही स्वार्थाची द्वैतभावना त्यांच्यात असत नाही द्वताच्या स्वार्थी भावने मुळे भय निर्माण होत· असते. संत-सज्जन लोक अद्वैती असल्याने त्याना भयाचा लवलेश सुद्धा असत नाही.

जिवां श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले ।
परी जीव अज्ञान तैसेचि ठेले ॥

देहेबुद्धिचें कर्म खोटे टळेना ।
जुनें ठेवणें मीपणें आकळेना ।।१३७।।

संत-सज्जन लोक मानवाचे सर्वांत श्रेष्ठ असें कल्याण श्रीरामभक्तिपासून आहे याबद्दल परोपरीने सांगत असले तरी लोक त्यांच्याकडे कानाडोळा करतात आणि ऐहिक सुखोपभोगांत विमग्न होतात. शिवाय सुखोपभोगांत रममाण होण्याचा मोह काही केल्या आवरत नाही आणि त्या पायी कर्मबंध अनंत प्रमाणांत वाढल्याशिवाय रहात नाही. शिवाय मी मोठा शहाणा या अहं प्रवृत्ति मुळे त्याची चुकीच्या मार्गाची चूक त्याला उमगत नाही.

भ्रमें नाडळे वित्त तें गुप्त जालें ।
जिवा जन्मदारिद्र ठाकूनि आलें ।।

देहेबुद्धिचा निश्चयो ज्या टळेना ।
जुणें ठेवणें मीपणें आकळेना ॥१३८॥

सुखलालसेच्या भ्रमामुळे श्रीरामभक्ति रूपी अमोल ठेवा आपलासा करता येत असूनहि माणूस त्याकडे कानाडोळा करतो. साहजीकच जन्म-मरणाच्या फेऱ्यांचें दारिद्रय भोगण्याची पाळी त्याच्यांवर यते. 'हा देह माझा व मी देहाचा' ही देहात्मभावना माणसाच्या अंगीं निगरगट्टपणें वास करीत असल्याने या 'मी' पणा पायीं श्रीरामभक्तीचा अमोल ठेवा त्याला लाभत नाही.

पुढें पाहतां सर्वही कोंदलेंसे ।
अभाग्यास हें दृष्य पाषाण भासे ॥
अभावें कदा पुण्य गांठीं पडेना ।
जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥१३९॥

श्रीराम सर्वत्र अस्तित्वांत आहे. परंतु भक्ति भावना नसलेल्या सुखलोलूपतेचा कैफ ज्याच्या डोळ्यांवर चढलेला आहे अशा अभागी माणसास श्रीरामाच्या स्वरूपा ऐवजी कुवकामाचे निरूपयोगी दगडच सर्वत्र पसरलेले आहेत असा त्याला भास होतो. या अश्रद्धेमुळे त्याचा पुण्यसंचय होत नाही. माणसांत दडलेल्या देहात्मबुद्धिमुळे श्रीराम रूपीं जुना ठेवा त्याला सापडत नाही.

जयाचें तया चूकलें प्राप्त नाहीं ।
गुणें गोविलें जाहलें दुःख देहीं ॥
गुणावेगळी वृत्ति तेही वळेना ।
जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥१४०॥

श्रीरामभक्ति रूपीं धन प्रत्येकाचें असलें तरी अज्ञानामुळें तें काही लोकाना मिळत नाही, सत्व, रज, तम हे त्रिगुण आत्म्यास देहांत गुरफटून

टाकत असतात. या त्रिगुणांच्या प्रादुर्भावामुळे माणसास दुःख व यातना होत असतात आत्मा या त्रिगुणांच्या मोहांत गुरफटून पडतो व त्यामुळे त्रिगुणापासून त्याची सुटका होणें अशक्य होत असल्याने त्याला श्रीरामभक्ताचा ठेवा दुर्लभ होतो. आत्म्याची देहात्म भावना मावळल्याविना त्याला श्रीरामभक्ति मिळू शकत नाही.

म्हणे दास सायास त्याचे करावे ।
जनीं जाणता पाय त्याचे धरावें ॥
गुरुअंजनेंवीण तें आकळेना ।
जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ॥१४१॥

त्रिगुणांच्या देहात्मबुद्धीच्या मोहातून सटकण्यासाठी जाणत्या माणसास गुरू करून त्याचे पाय धरावेत. त्यांची सेवा करावी. म्हणजे या सर्वातून सुटण्याचा मार्ग गुरु दाखवू शकेल. देहात्मबुद्धि-

मुळे श्रीरामभक्ति दुर्मिळ होते. ती गुरूच्या मार्गदर्शनाने प्राप्त करून घेण्याचा मार्ग सापडतो.

कळेना कळेना कळेना ढळेना ।
ढळे नाढळे संशयोही ढळेना ॥
गळेना गळेना अहंता गळेना ।
बळे आकळेना मिळेना मिळेना ॥१४२॥

श्रीरामभक्ति करण्याचा मार्ग गुरूशिवाय सापडत नाही श्रीरामाच्या अलौकिकत्वाबद्दल मनांत ज्या शंका-कुशंका असतात त्या गुरुशिवाय दूर होत नाहीत. गुरुच्या मार्गदर्शनाशिवाय अहंता देहात्मबुद्धि सुटत नाही. श्रीरामभक्तीचा मार्ग हा अट्टाहासाने प्राप्त होण्यासारखा नसून गुरूच्या मार्गदर्शनाने विनासायास गवसतो.

अविद्यागुणें मानवा ऊमजेना ।
भ्रमें चूकलें हीत ते आकळेना ॥

परीक्षेविणें बांधिलें दृढ नाणें ।
परी सत्य मिथ्या असें कोण जाणें ॥१४३॥

माणूस अनभिज्ञ असल्याने स्वहित त्याला कळत नाही. मायेच्या भ्रमामुळे स्वतःचे हित त्याच्या ध्यानीं येत नाही. सारासार विचार केल्याशिवाय खऱ्या-खोटयाची पारख केल्याशिवाय एखाद्याने दिलेलें खोटें नाणें कमरेस, कडोसरीस लावावें, त्याचप्रमाणें खऱ्या खोटयांची शहानिशा न करता माणूस वागत असतो. त्यामुळे तो फसतो व दुःखी होतो. हा अनभिज्ञपणा दुःखास कारणीभूत होतो.

जगीं पाहतां साच तें काय आहे ।
अती आदरें सत्य शोधूनि पाहें ॥
पुढें पाहतां पाहतां देव जोडे ।
भ्रम भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे ॥१४४॥

सर्वात सुयोग्य गोष्ट कोणती या संबंधी तू शोध घे. अत्यत निष्ठेने तू या गोष्टीची शहानिशा करून घे व सत्य काय आहे तें समजावून घे. असें केल्याने ही सर्वात सुयोग्य व सर्वश्रेष्ठ गोष्ट श्रीरामभक्ति आहे याची तुला खात्री होईल व तू रामभक्तीस लागशील व त्यामुळे श्रीरामाचा अनुग्रह तुला लाभेल या अनुग्रहामुळे सर्व प्रकारचे गैरसमज व अज्ञान हे सर्व कोटाळ दूर होऊन तू सुखी होशील.

सदा वीषयो चिंतितां जीव जाला ।
अहंभाव अज्ञान जन्मासि आला ।।
विवेकें सदा स्वस्वरूपीं भरावें ।
जिवा ऊगमीं जन्म नाहीं स्वभावें ।।१४५।।

आत्मा हा प्रथम ब्रम्हस्वरूप व कर्मबंधमुक्त असतो. परंतु लैंगिक भावनेच्या आहारी गेल्याने

अहंभाव व अज्ञान यानी तो पछाडला जातो आणि अशा स्वरूपांत आत्मा जन्म घेतो. म्हणजे मानवी शरीराच्या स्वरूपांत जन्मास येतो. आत्म्यास जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून हिंडावें लागतें. यदकदाचित पुढे त्याला विवेक सुचलाच तर तो आत्मस्वरूपाच्या म्हणजे मुळच्या ब्रह्म-स्वरूपाच्या शोधास लागतो. निष्ठेने प्रयत्न केल्यास त्याला पूर्वीचें ब्रह्मस्वरूप पुन्हा मिळते त्यामुळे जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून त्याची सुटका होते.

दिसे लोचनीं तें नसे कल्पकोडी।
अकस्मात आकारलें काळ मोडी॥
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे।
मना संत आनंत शोधूनि पाहें॥१४६॥

आपल्या डोळ्यास जें जें दिसतें तें तें कल्पकोटी

म्हणजे शाश्वत टिकणारें नसून तें नाशिवंत असतें जें जें म्हणून निर्माण होतें, तें तें सर्व काळाच्या भक्षस्थानी पडून नाश पावते. पुढें जेव्हा प्रलय-काळ येईल तेव्हा तर सर्वच नाश पावणार आहे. म्हणून बा मना, जें संत प्रवृत्तींचें आहे व जें अमरत्व प्राप्त करून देणारें आहे, अशाचा तू त्वरेने शोध घे. अमरत्व प्राप्त करून देणारें एक-मेव अद्वितीय साधन म्हणजे श्रीरामनाम घेणें होय. त्याचा तू स्वीकार कर.

फुटेना तुटेना चळेना ढळेना ।
सदा संचलें मीपणें तें कळेना ।।
तया एकरूपासि दूजें न साहे ।
मना संत आनंत शोधूनि पाहें ।।१४७।।

श्रीरामाचें स्वरूप चिरंतर शाश्वत असून तें सर्वत्र विखूरलेलें आहे. कोणी तें हिराऊन घेऊ शकत

नाही की तें तुटून-फुटून जाऊ शकत नाही कीं तें नाश पाऊ शकत नाही. सदासर्वदा तें सर्वत्र विखूरलेंलें असतें. असें असलें तरी वासनेच्या मी पणामुळे तें समोर असूनहि दिसत नाही. या श्रीरामाचे महात्म्य, त्याचा महिमा अलौकिक व लोकोत्तर आहे. म्हणून त्याच्या बरोबरीचें कोणीहि नाही अगर कोणी केलेलें त्याला खपतसुद्धा नाही. म्हणून बा मना, इतरांच्या भजनी लागण्यापेक्षा श्रीराम भक्तीचा अलौकिक व सर्वश्रेष्ठ मार्ग तू स्वीकार.

निराकार आधार ब्रम्हादिकांचा ।
जया सांगतां सीणली वेदवाचा ।।
विवेकें तदाकार होऊनि राहें ।
मना संत आनंत शोधूनि पाहें ।।१४८।।

परब्रम्ह हें आकार विहीत म्हणजे निराकार आहे.

त्याच्या आधारावरच विश्वनिर्माता ब्रह्मदेवा-सारखे देव टिकून आहेत. परब्रह्माची थोरवी वेदासारखे महान ग्रंथ सुद्धा फार मोठ्या प्रमाणांत गात असतात. म्हणून तू सुद्धा या परब्रह्माशीं एकरूप होण्याचा प्रयत्न कर. त्यासाठी परब्रह्माशीं एकरूप होण्याचा मार्ग तू धुंडाळू लाग.

जगीं पाहतां चर्मचक्षीं न लक्षे ।
जगीं पाहतां ज्ञानचक्षीं न रक्षे ।।
जगीं पाहतां पाहणें जात आहे ।
मन संत आनंत शोधूनि पाहें ।।१४९।।

सर्वत्र पाहिलें तरी साध्या डोळ्यानी तें परब्रह्म कोठेहि दिसणार नाही. परंतु माणसाचें ज्ञान वाढलें व तें परिपक्व झालें म्हणजे माणसास तें **दिसू** लागतें. ज्ञानवृद्धि करून पाहण्याचा कोणी प्रयत्न करीत नसल्याने कोणी पाहू गेले तरी

त्याला तें दृष्टीस पडेनासे होतें. म्हणून बा मना, तें परब्रम्ह कसें आहे तें तू शोधून पहा. त्यासाठी तुला ज्ञान-प्रगल्ब व्हावें लागेल.

नसे पीत ना श्वेत ना श्याम कांहीं ।
नसें व्यक्त अव्यक्त ना नीळ नाहीं ॥
म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहे ।
मना संत आनंत शोधूनि पाहें ॥१५०॥

हें परब्रम्ह पिवळें नाही, सफेद नाही, काळे नाही, प्रगट नाही, अगर अप्रगटहि नाही. तें पूर्णपणें निराकार आहे. परंतु त्याच्या बद्दल नितांत श्रद्धा ठेव म्हणजे तुला जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून मुक्ति मिळते असें मी खात्रीपूर्वक सांगतो असें सद्‌गुरू श्रीरामदास स्वामी म्हणतात. म्हणून ज्यास अंत नाही अशा परब्रम्हाचा तू शोध घे.

खरें शोधितां शोधितां शोधताहे ।
मना बोधितां बोधितां बोधीताहे ॥
परी सर्वही सज्जनाचेनि योगें ।
बरा निश्चयो पाविजे सानुरागें ॥१५१॥

रास्त व योग्य मार्गाने प्रयत्न केला तरच परब्रह्माचा शोध लागतो. त्याचप्रमाणें योग्य मार्गाने तें समजावून घेण्याचा प्रयत्न केला तर त्याचा बोध होतो, त्याचें आकलन होते. परंतु हें परब्रम्हाचें आकलन संत-सज्जन लोकांच्या संगतीनेच होऊ शकते. अशा संत-सज्जन लोकाना आपले सद्गुरु म्हणून समजून त्याची सेवा करून त्यांची कृपा प्राप्त झाली पाहिजे. म्हणजे परब्रम्हाच्या साक्षात्काराचा मार्ग ते दाखवितात.

बहूतांपरी कूसरी तत्वझाडा ।
परी अंतरीं पाहिजे तो निवाडा ॥

मना सार साचार तें वेगळें रे ।
समस्तांमध्यें एक तें आगळें रे ।।१५२।।

भरपूर शाहणपणाने खुलासा करण्याचा प्रयत्न केला अगर शब्दांचा उलगडा करणारी तत्वज्ञान-प्रचूर व्याख्यानें झोडली म्हणजे काही परब्रम्हाचा साक्षात्कार होऊ शकत नाही. त्यासाठी भक्ति-भावना व श्रद्धा हवी. बा मना, म्हणून तू तात्विक काथ्याकुटाच्या फंदांत पडू नको. खरें परब्रम्ह तात्विक काथ्याकुटाने उमगण्यासारखे नाही. सगळयापेक्षा त्याचें स्वरूप वेगळ्या धर्तीचे असून तें फक्त अनुभवानेच उमगते. त्याची योग्यता सर्वश्रेष्ठ नव्हे तर महाश्रेष्ठ आहे.

नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्वज्ञानें ।
समाधान कांहीं नव्हे तानमानें ।।

नव्हे योगयागें नव्हे भोगत्यागें ।
समाधान तें सज्जनाचेनि योगें ॥१५३॥

परब्रम्हाचें ज्ञान म्हणजे काही शरीर विज्ञान अगर तत्वज्ञान अगर संगीतज्ञान अगर संगीतसेवा नव्हे. योगयाग अगर सुखोपभोगत्याग करून त्या परब्रह्माचें आकलन होऊ शकणार नाही. सामान्य माणूस वरील साधनाच्या साहाय्याने परब्रम्ह मिळविण्याचा वृथा प्रयत्न करून पाहतो. पण तें सर्व निरर्थक ठरतें तें फक्त संत-सज्जन लोकाना गुरू केल्यानेच तें मिळतें.

महावाक्य तत्वादिकें पंचिकर्णें ।
खुणें पाविजे संतसंगे विवर्णें ॥
द्वितीयेसि संकेत जो दाविजेतो ।
तया सांडुनी चंद्रमा भाविजेतो ॥१५४॥

महावाक्य, तत्वे, पंचीकरणें इत्यादीकांची सांगो-पांग माहिती संत सद्गुरूकडून करून घ्यावी. म्हणजे परब्रह्माचें ज्ञान तुला होईल. एखाद्यास बिजेची चंद्रकोर दाखवावयाची असली म्हणजे फलाण्या झाडाच्या फलाण्या फांदीकडे पहात रहा अशी आपण खूण दाखवितो. फांदीच्या अनुशंगाने चंद्र दिसला म्हणजे फांदीकडील लक्ष्य पूर्णपणें नाहीसें होतें व तें चंद्राकडे केंद्रित होतें. याच न्यायाने पंचीकरणें आदि तत्वज्ञानाच्या ज्ञान-ग्रहणाच्या अनुशंगाने तू परब्रह्माचा साक्षात्कार करून घे.

दिसेना जनीं तेंचि शोधूनि पाहें।
बरें पाहतां गूज तेंथेंचि आहे ॥
करीं घेऊं जातां कदा आडळेना।
जनीं सर्व कोंदाटलें तें कळेना ॥१५५॥

साध्या डोळ्यांनी सर्वत्र शोधू गेले तरी तें दिसत नाही. म्हणून त्याचा ज्ञानदृष्टीने तू शोध घे म्हणजे तुला परब्रह्म आढळेल. अशा प्रकारें अति सूक्ष्म ज्ञानी दृष्टिकोनांतून पाहू गेल्यास परब्रह्म हें संपूर्ण विश्वाचें सार-सर्वस्व आहे असें तुला आढळून येईल. हें परब्रह्म हातानें गोळा करतो म्हटले तरी तें हाताशीं लागणें शक्य नाही. तें फक्त ज्ञानामुळेच हातीं लागेल. तें सर्वत्र अणुरेणूंत सामावलेलें आहे. तरी तू ते पहा.

म्हणे जाणता तो जनीं मूर्ख पाहे।
अतर्कासि तर्की असा कोण आहे ॥
जनीं मीपणें पाहतां पाहवेना।
तया लक्षितां वेगळें राहवेना ॥१५६॥

मला ब्रह्म कळालें आहे, तें मी जाणतो अशी वल्गना कोणी करीत असेल तर त्यास मूर्ख सम-

जावें कारण परब्रम्ह तर्क करण्याच्या सुद्धा पली-कडचे आहे. हें परब्रम्ह 'मी मोठा शाहणा' या अहंवृत्तिने कधीसुद्धा गवसणार नाहीं. अहंवृत्ति सोडून जो शोधण्याचा प्रयत्न करील त्यालाच तें गवसल्याशिवाय राहणार नाही.

बहू शास्त्र धुंडाळितां वाड आहे ।
जया निश्चयो येक तोहि न साहे ।।
मती भांडती शास्त्रबोधें विरोधें ।
गती खुंटती ज्ञानबोधें प्रबोधें ।।१५७।।

जेवढी म्हणून शास्त्रें धुंडाळावीत तेवढीं थोडीच होत. प्रत्येकाचे शास्त्रार्थ वेगवेगळे निघतात. त्यांच्यात परब्रम्हाच्या स्वरूपाबद्दल मत-भिन्नता आढळून येते. परस्पर विरोधी माताबद्दल प्रत्येक बाजूचे लोक माझेंच मत खरे असें प्रतिपादून भांडत बसतात. परंतु यथायोग्य ज्ञान संपादन

केले म्हणजे परब्रम्हाच्या खऱ्या स्वरूपाचा अर्थ उमगू लागतो म्हणून तू योग्य ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न कर.

श्रुती न्याय मीमांसकें तर्कशास्त्रें ।
स्मृति वेद वेदांतवाक्यें विचित्रें ॥
स्वयें शेष मौनावला स्थीर राहे ।
मना सर्व जाणीव सांडून पाहें ॥१५८॥

उपनिषदें, न्यायशास्त्र, मीमांसाशास्त्र, तर्कशास्त्र, स्मृति, वेद इत्यादि मोठाले श्रेष्ठ ग्रंथ यानी परब्रम्हाचे भिन्न-विभिन्न अर्थ लावलेले आहेत बोलण्यांत वाक्‌बगार असा शेष सुद्धा परब्रम्हासबधी काहीसुद्धा न बोलता मौन धरून राहिलेला आहे. म्हणून आपल्या बुद्धिमत्तेचा अहंकार व मीपणाची वृत्ति तू सोडशील तरच तुला परब्रम्हाचें गूढ कोडें उकलेल.

जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची ।
तया भोजनाची रुची प्राप्त कैंची ।।
अहंभाव ज्या मानसीचा विरेना ।
तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ।।१५९।।

'मी मोठा' या अहंवृत्तीने जो पछाडलेला आहे, अहंरूपी माशी ज्याने गिळलेली आहे, त्याला ज्ञानरूपी बोधांमृताच्या जेवणांत रूची अगर स्वारस्य काय वाटणार? अहंभावाचा वास ज्या माणसामध्यें आहे, त्याला ज्ञानामृत पचत नाही. ज्ञान नसल्याने परब्रम्हाचें आकलन होत नाही. अहंकार गेल्याशिवाय ज्ञान ग्रहण होत नाही.

नको रे मना वाद हा खेदकारी ।
नकोरे मना भेद नाना विकारी ।।
नको रे मना सीकऊं पूढिलांसी ।
अहंभाव जो राहिला तूजपासीं ।।१६०।।

बा मना, वाद विवाद हे अत्यंत दुःखप्रद असतात. वादविवादांतून मतभेद बेबनाव होऊन त्या पासून नाना वाईट विचाराना चालना मिळत असते. म्हणून वाद विवादास कारणीभूत होणारा अहं-भाव अथवा अहंवृत्ति तू पूर्णपणें सोडून टाक. निदान ती जवळ असताना लोकाना भलत्याच गोष्टी शिकविणें व्यर्थ आहे. तू अंगी सौजन्य व मार्दव आणण्याचा एक सतत प्रयत्न करीत रहा.

अहंता गुणें सर्वही दुःख होतें ।
मुखें बोलिलें ज्ञान तें व्यर्थ जातें ।।
सुखी राहतां सर्वही सूख आहे ।
अहंता तुझी तूंचि शोधूनि पाहें ।।१६१।।

घमेंडीवृत्तिपायी गुर्मी वाढते. गुर्मीमुळे संघर्ष वाढतो. त्यामुळे दुःख होते. घमेंडीची भाषा शेवटीं फुसकीच ठरते. अहंभाव सोडला व सत्वगुणाचा

अविश्कार केला म्हणजे दुःखाचा नाश होऊन सुखाची व आनंदाची लयलूट होते. म्हणून दुःखाचें मूळ जी अहंता म्हणजे घमेंडी वृत्ति ती कसकशी निर्माण होते हें शोधून काढून तिचें तू समूळ उच्चाटन करण्याच्या मागें लाग. अहंकार काढून टाकण्याचा अतोनात प्रयत्न कर.

अहंतागुणें नीति सांडी विवेकी ।
अनीतीबळें श्लाघ्यता सर्व लोकीं ।।
परी अंतरीं सर्वही साक्ष येते ।
प्रमाणांतरें बुद्धि सांडूनि जाते ।।१६२।।

अत्यंत विवेकी व सूज्ञ माणूस जरी असला तरी अहंकाराच्या आहारी गेल्याने त्याची सद्सद्-विवेकबुद्धि नाहीशी होते व त्या माणसाचा नैतिक तोल ढळतो व तो नीतिनियम गुंडाळून ठेऊन बेतालपणाचें व बेफामपणाचें वर्तन करू लागतो.

यामुळे समाजातील त्याची प्रतिष्ठा संपुष्टांत येऊन समाज त्याच्याकडे अत्यंत तुच्छतेने पाहू लागतो.
यामुळे समाजातील त्याची प्रतिष्ठा संपुष्टांत येऊन समाज त्याच्याकडे अत्यंत तुच्छतेने पाहू लागतो.
परंतु आतून या अनीतीबाबत त्याचे मन आतल्या-आत खात असतें. त्याला सर्वश्रेष्ठ ग्रंथांची वचनें प्रमाणभूत असल्याची खात्री असली तरी अहंकार या सर्व पटणाऱ्या गोष्टीजवळ सुद्धा त्याला काना-डोळा करावयास लावतो.

देहेबुद्धिचा निश्चयो दृढ जाला ।
देहातीत तें हीत सांडीत गेला ।।
देहेबुद्धि ते आत्मबुद्धि करावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ।।१६३।।

'हा देह माझा, स्वतःचा व देहाचा' ही देहबुद्धि भावना ज्याच्या जवळ बोकाळलेली आहे त्याला मृत्यूनंतर पदरी पड पाहणाऱ्या मुक्ति-सारख्या कल्याणप्रद गोष्टी सुद्धा कायमच्या

मुकतात. म्हणून 'अहं ब्रह्मास्मि' अशी मी देहाचा नव्हे तर परब्रह्माचा असून, देहाशीं समरस होण्या-ऐवजी परमात्म्याशीं तादात्म्य पावण्याची वृत्ति तू ठेव म्हणजे तुझे या जन्मीं व मृत्युनंतर सुद्धा परमश्रेष्ठ कल्याण होईल. ही देहभावना जावयाची असल्यास सदासर्वदा तू संत-सज्जन लोकांच्या संगतीत राहण्याचा व त्यांच्याकडून विदेही भावना समजावून घेण्याचा प्रयत्न कर.

मनें कल्पिला वीषयो सोडवावा।
मनें देव निर्गूण तो वोळखावा॥
मनें कल्पितां कल्पना ते सरावी।
सदा संगती सज्जनाची धरावी॥१६४॥

मानव मनांतल्या मनात मानतो ती द्वैत कल्पना म्हणजे देव व भक्त भिन्न-भिन्न ही अनाठायी भावना सोडून टाकावी. त्याचप्रमाणे 'मी म्हणजे

परब्रह्म ' ही अद्वैत भावना पण व्यर्थच ठरत असल्याने ती पण सोडून टाकावी. द्वैत व अद्वैत दोन्ही कल्पना सोडून देवाचें स्वरूप निर्गुण आहे अशी दृढ श्रद्धा धरावी. हें निर्गुण स्वरूप समजण्यासाठी संत-सज्जन लोकांची संगत धरावीं. म्हणजे निर्गुणाचा संपूर्ण उलगडा होईल.

देहादीक प्रपंच हा चिंतियेला।
परी अंतरीं लोभ निश्चित ठेला॥
हरीचिंतनें मुक्तिकांता वरावी।
सदा संगती सज्जनाची धरावी॥१६५॥

देहात्मभावनेमुळे माणसास प्रपंचाबद्दल निरतिशय आस्था वाटू लागते आणि या प्रपंच आस्थेपायीं माणसाच्या मनांत लोभ घर करू लागतो. प्रपंचांतील कांतेचा म्हणजे पत्नीचा हव्यास धरण्याऐवजी परमेश्वराच्या नामस्मरणामुळे

प्राप्त होऊ शकणाऱ्या मुक्तिरूपी पत्नीचा अनुयय करणें योग्य ठरेल परंतु हें सर्व घडून यावयाचें असल्यास संत-सज्जन लोकांचा सहवास जोडणें नितांत आवश्यक आहे, हें विसरू नये.

अहंकार विस्तारला या देहाचा।
स्त्रियापुत्रमित्रादिकें मोह त्यांचा ॥
बळें भ्रांति हे जन्मचिंता हरावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ॥१६६॥

'हा देह माझा आणि मला सर्व काही उपभोगावयास मिळालें पाहिजे' ही माया प्रत्येक माणसाच्या अगीं ठाण मांडून बसलेली आहे. स्त्रिया, मुलें, आप्त याच्या मोहपाशांत माणूस पूर्णपणें गुरफटलेला असतो. परंतु या सर्व गोष्टी मायावी व तात्पुरत्या आहेत. या सर्वामुळे कर्मबंध वाढत जाऊन जन्म-मरणाचा फेरा आणखी जास्ती

लांबत जातो. ही मोहमाया व त्यापासून निर्माण होणाऱ्या जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटण्याचा सोपा मार्ग समजावून घ्यावयाचा असेल तर संत-सज्जन लोकांशी स्नेहसंबंध वाढवून त्यांच्याकडून सहवासाने या गोष्टी समजावून घ्याव्यात.

बरा निश्चयो शाश्वताचा करावा ।
म्हणे दास संदेह तो वीसरावा ।।
घडीनें घडी सार्थकाची करावी ।
सदा संगती सज्जनाची धरावी ।।१६७।।

क्षणभंगूर प्रापंचिक गोष्टीचा नाद सोडूत चिरकाल टिकणाऱ्या मुक्तिचा निधिध्यास माणसाने घेतला पाहिजे. त्यासाठी 'मी म्हणजे माझा देह' ही देहात्मभावना टाकून 'मी म्हणजे आत्माराममय होय' अशी विदेही भावना उरीं बाळगावी. आयुष्यांतील शक्य तितका वेळ श्रीरामचिंतनांत

घालवावा. श्रीराम या दैवताच्या अद्वितीयपणा बद्दल शंका न बाळगता निशंकपणें त्यासच भजावें. असेंच वागणें सर्वथैव दृष्टया सुयोग्य कसें याचा खुलासा संत-सज्जन लोकाकडून समजावून घ्यावा.

करी वृत्ति जो संत तो संत जाणा ।
दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा ॥
उपाधी देहेबुद्धिते वाढवीते ।
परी सज्जना केवि बाधूं शके ते ॥१६८॥

आपली वृत्ति जो शांत, संयमी, स्थिर, विवेकी, प्रेमळ व सात्विकतेची ठेवतो आणि प्रापचिक मोहाच्या पायी गुरफटून वारंवार दुःख-संकट परंपरांच्या चक्रांत जो सापडलेला नाही त्यासच 'संत' समजावें. देहाची म्हणजे प्रपंचाची आस्था बाळगली म्हणजे त्या पाठोपाठ यातना, उपद्रवांचा

ससेमिरा एकसातत्त्याने पाठपुरावा करू लागतो. परंतु या खडतर यातना फक्त सामान्य माणसास नामोहरम करीत असल्या तरी संत-सज्जन लोकाना त्यांचा जरा सुद्धा उपसर्ग पोचू शकत नाही.

नसे अंत आनंत संता पुसावा।
अहंकारविस्तार हा नीरसावा॥
गुणेंवीण निर्गूण तो आठवावा।
देहेबुद्धिचा आठवो नाठवावा॥१६९॥

ज्याला अंत नसून जे चिरशाश्वत आहे अशा परब्रम्हाच्या स्वरूपा बद्दलचें ज्ञान संत-सज्जन लोकाकडून करून घ्यावें आणि आत्म्याचा देहासक्तीचा अहंकार म्हणजे आसक्ति कायमची सोडावी. परमात्म्याची निर्गुण भक्ति करावी. म्हणजे दांभिक कृत्याऐवजी उपासनाभक्तीचा

मार्ग धरावा. ही उपासना करीत असता देहासक्ति कटाक्षपूर्वक टाळली पाहिजे.

देहेबुद्धि हे ज्ञानबोधें त्यजावी ।
विवेकें तयें वस्तुची भेटि घ्यावी ।।
तदाकार हे वृत्ति नाहीं स्वभावें ।
म्हणोनि सदा तेंचि शोधीत जावें ।।१७०।।

ब्रम्हज्ञान प्रगल्भ करावें म्हणजे देहांवरची आसक्ती सुटते. विवेकपूर्वक परब्रम्हाशी तादात्म्य होण्याची खटपट चालू ठेवावी. पूर्वजन्मीच्या संस्कारामुळे सर्व सामान्य माणसाची प्रवृत्ति पर-ब्रह्माशीं तादात्म्य होण्याऐवजीं सुखोपभोगांत तल्लीन होते. परंतु त्यामुळे पुनर्जन्माचा द्राविडी-प्राणायाम करीत बसण्याचा फेरा लांबतो. म्हणून या यातायातीपासून कायमचें मुक्त होण्यासाठी

निष्ठेने परब्रह्माशीं तादात्म्य-एकरूप होण्याचा तू प्रयत्न चालव.

असे सार साचार तें चोरिलेंसे ।
इहीं लोचनीं पाहतां दृष्य भासे ।।
निराभास निर्गूण तें आकळेना ।
अहंतागुणें कल्पितांहि कळेना ।।१७१

परब्रह्म हें संपूर्णपणें निराभास, निराकार असल्याने तें आपण पाहू शकत नाही. मात्र हें ऐहिक जग पूर्णपणें दृष्य स्वरूपांत साकारलेलें असल्याने नेमकें तें तेवढच आपणास दिसतें. सुखोपभोगाच्या लालसे पायीं ऐहिक जगांत तल्लीन झाल्यामुळे आपणास परब्रह्माची कल्पनाहि करवत नाही.

स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या ।
स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या ।।

मुळीं कल्पना दोरूपें तेचि जाली ।
विवेकें तरी स्वस्वरूपीं मिळाली ॥१७२॥

वैषयिक विषयांत भराऱ्या मारणारी कल्पना बुद्धि वाईट बुद्धि होय अशा वृत्तिमुळे माणसाचें घोर अकल्याण होते आणि परब्रम्हाशी तादात्म्य होण्यासाठी कल्पनेच्या भराऱ्या मारण्यांत रंगून जाणाऱ्या बद्धीस सुबुद्धि समजावे. बुद्धि एकच जरी असली तरी तिला अशी भिन्न-भिन्न वळणें लागतात. तरी विवेकपूर्वक वर वर्णिलेल्या 'सुबुद्धी'च्या आहारीं जाणें कल्याणकारी ठरणारें आहे.

स्वरूपीं उदेला अहंकार राहो ।
तेणें सर्व आच्छादिलें व्योम पाहो ॥
दिशा पाहतां ते निशा वाढताहे ।
विवेकें विचारें विवंचूनि पाहें ॥१७३॥

देहासक्तीरूपी राहु उदयास येतो आणि तो आत्मरूपी चंद्रास आच्छादून टाकतो. देहासक्तीच्या अहंकाराने आत्मरूपाची विस्मृति घडून येते. सर्व आकाश देहासक्तिरूपी राहूने ग्रासल्यामुळे चहूकडे कोठेंहि पहावें तेथें आत्मरूपाचा अज्ञान अंधःकार आढळून येऊं लागतो. तरी बा मना, तू अंधःकारांत दडलेलें आत्मज्ञानरूपी सत्य शोधून पहा.

जया चक्षूनें लक्षितां लक्षवेंना ।
भवा भक्षितां रक्षितां रक्षवेना ॥
क्षयातीत तो अक्षयी मोक्ष देतो ।
दयादक्ष तो साक्षिनें पक्ष घेतो ॥१७४॥

शाश्वत ब्रम्ह हें साध्या डोळ्याने पाहण्याचा प्रयत्न केला तरी तें दिसत नाही. मात्र एकदाका ब्रम्हज्ञानाचा साक्षात्कार झाला म्हणजे जन्म-मर-

णाचा हा प्रपंच मात्र नाश पावतो. मग त्यास कोणी रक्षू शकत नाही. ब्रम्हज्ञानामुळे जन्ममरणाचा फेरा चुकतो. तो परमात्मा स्वतः चिरंजीव असून आपल्या भक्ताना जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून वाचवितो. येवढेच काय त्याना सायुज्य म्हणजे कायमची मुक्ति देतो. शिवाय तो परम दयाळू परमात्मा आपल्या भक्तांचें वेळोंवेळों सर्वतोपरीने रक्षण करतोच केवढे हे त्याचें महात्म्य ?

विधी निर्मिता लीहितो सर्व भाळीं ।
परि लीहितो कोण त्याचे कपाळी ।।
हरू जाळितो लोक संहारकाळीं ।
परी सेवटी शंकरा कोण जाळी ।।१७५।।

माणसास जन्मास घालण्याआधी त्याच्या कपाळीं त्याच्या जीवनाचा आलेख ब्रम्हदेव कोरून ठेवतो. तर त्या ब्रम्हदेवाच्या कपाळीं त्याचें विधिलिखित

कोण लिहीतो हें एक न उलगडणारे गूढ कोडे होय. माणसास मृत्यु देण्याचे काम श्रीशंकर पार पाडीत असतात. तर श्रीशंकरास मृत्युदिक्षा कोण देणारे असेल हें गूढ कोडें होय.

जगीं द्वादशादित्य हे रुद्र अक्रा ।
असंख्यात संख्या करी कोण शक्रा ॥
जगीं देव धुंडाळितां आढळेना ।
जनीं मुख्य तो कोण कैसा कळेना ॥१७६॥

या जगांत बारा आदित्य व अकरा रुद्र आहेत. इंद्र तर अगणित आहेत. त्यांची गणना कोणासहि करता यावयाची नाही. असें असले तरी या सर्व देवांचा देव कोणता हें या जगात सर्वत्र शोधले तरी सापडत नाही. त्यामुळे सर्वश्रेष्ठ व मुख्यदेव कोणास माहीत नाही. त्यामुळे सर्वश्रेष्ठ व मुख्य देव कोणास मानावें हें कळत नाही आणि तें कळाल्या

शिवाय जन्म-मरणाच्या दुःखद फेऱ्यांतून सुटका होऊ शकत नाही.

तुटेना फुटेना कदा देवराणा।
चळेना ढळेना कदा दैन्यवाणा॥
कळेना कळेना कदा लोचनासी।
वसेना दिसेना जनीं मीपणासी॥१७७॥

मुक्ति देणारा हा परमेश्वर मोडत नाही फुटत नाही की तुटत नाही. पडत नाही की चालत नाही. तो पूर्णपणें निराकार व मायारहीत असल्याने साध्या डोळ्याना दिसत नाही तो निराकार असल्याने दैन्यवाणेंपणाची बाधा त्यास पोहोचू शकत नाही. देहासक्तीच्या मीपणामुळे ब्रह्मज्ञान होत नाही व तो त्यामुळे दिसत नाही.

जया मानला देव तो पूजिताहे।
परी देव शोधूनि कोणी न पाहे॥

जगीं पाहतां देव कोटयानुकोटी ।
जया मानिली भक्ति जे तेचि मोठी ।।१७८।।

ज्या दैवतावर ज्याची श्रद्धा असेल त्याची तो भक्ति करतो. परंतु खरें व सर्वश्रेष्ठ दैवत कोणतें याचे रहस्य शोधण्याचा कोणीच प्रयत्न करीत नाही जगांत असंख्य दैवतें श्रेष्ठ वाटतात. परंतु खऱ्या देवाचा, सायुज्य मुक्ति देणाऱ्या देवाचा शोध कोणीच घेत नाही.

तिन्हीं लोक जेथूनि निर्माण जाले ।
तया देवरायासि कोणी न बोले ।।
जगीं थोरला देव तो चोरलासे ।
गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ।।१७९।।

स्वर्ग, पृथ्वी, पातालादि तीन्ही लोकांची निर्मिति ज्याच्यामुळे झालेली आहे, अशा सर्वश्रेष्ठ देवाची भक्ति करण्याकडे कानाडोळा करण्याची प्रवृत्ति

प्रत्येकाची आहे. या परमेश्वराला समजावून घेण्याचा कोणी प्रयत्न करीत नाही. त्यामुळे त्याच्या संबंधी विशेषसा बोलबाला होत नाही. सुयोग्य गुरूकडून आत्मज्ञान करून घेतलें म्हणजे त्याच्या संबंधीची समग्र माहिती उपलब्ध होईल. गुरू केल्याशिवाय ब्रम्हज्ञान होणार नाही.

गुरु पाहतां पाहतां लक्ष कोटी।
बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी॥
मनीं कामना चेटकें धातमाता।
जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता॥१८०॥

समाजात असंख्य गुरू वावरत असल्याचें आपण पाहतो. त्याच प्रमाणें मंत्रतंत्रादि साधनांचे प्रकार सुद्धा अगणित आहेत. प्रत्येकजण बुवाबाजीचें स्तोम माजवून समाजास आपला प्रभाव दाखवीत असतात. भोंदू लोक मनांतून स्वार्थी व कपटी

असतात. भंपक काल्पनिक गोष्टी सांगून ते आपलें स्तोम माजवितात. परंतु हे बाष्कळ गुरू व्यर्थ होत. सद्गुरू विना मुक्तिचा मार्ग कोणी दाखवू शकणार नाहीं. म्हणून गुरूच्या नादी न लागता सद्गुरूकडून मुक्ति मिळण्याचा रस्ता समजावून घे.

नव्हे चेटकू चाळकू द्रव्यभोंदू ।
नव्हे निंदकू मत्सरू भक्तिमंदू ।।
नव्हें उन्मतू वेसनी संगबाधू ।
जनीं ज्ञानिया तोचि साधू अगाधु ।।१८१।।

सद्गुरू म्हटला म्हणजे तो चेटकादि अघोरी कृत्यें करणारा असत नाही. तो लोकांची फसवणूक करीत नाही. तो लोकाना नागवीत नाही. लुबाडत नाही. तो बुवाबाजी माजवून समाजाकडून पैसे उकळत नाही. तो कोणाचें वैर करीत नाही

कीं कोणाचा मत्सर करीत नाही की तो पाखंडी असत नाही. तो अतिशय विनयी व निगर्वी असून त्यास घमेंड वा उर्मटपणा जडलेला नसतो. तो कोणत्याहि व्यसनापासून पूर्णपणें अलिप्त असतो. त्याची संगत कोणास बाधावयाची नाही की कोणाचें कसलेंच नुकसान व्हावयाचे नाही. या सर्व दुर्गुणापासून पूर्णपणें अलिप्त असणारा व ज्ञानप्रगल्ब असा संत-सज्जन माणूस सद्गुरु करण्याच्या योग्यतेचा आहे असें समजावें.

नव्हे वाउगी चाहुटी काम पोटीं ।
क्रियेवीण वाचाळता तेची मोठी ॥
मुखें बोलिल्यासारखें चालताहे ।
मना सद्गुरु तोचि शोधूनि पाहे ॥१८२॥

निष्कारण खोटी वटवट करणारा, ज्याला कामवासना जिंकता आली नाही असा, ज्याला उपा-

सना, भक्ति यांची आस्था नाही व जो स्वतः न आचरता लोकाना चांगले आचरण करण्याचा उपदेश करतो, असा गुरु सद्‌गुरु नव्हे. परंतु उपदेशावयाची गोष्ट स्वतःच्या आचरणांत परिपूर्ण उतरवून दाखवून मगच जो उपदेश करतो असा माणूस सद्‌गुरु होय. बा मना, खऱ्या सद्‌गुरूची परिपूर्ण पारख केल्याविना त्यास सद्‌गुरू करू नको. सद्‌गुरूचा आव आणणारे भोंदू गुरू जगांत खूप आहेत. म्हणून तू सावध रहा.

जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी।
कृपाळू मनस्वी क्षमावंत योगी ॥
प्रभू दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणें।
तयाचेनि योगें समाधान बाणें ॥१८३॥

जो खरा भक्त आहे, जो चतुर्विध ज्ञान प्रगल्भ

आहे, जो विवेकाने वागतो, ज्याने आसक्ति त्यागिली आहे, जो अत्यंत कृपाळू व दयाळू आहे, जो उदार व क्षमाशील वृत्तीचा आहे, जो अष्ठांग योगविद्येंत निपुण आहे, जो सामर्थ्यशाली व हुर-हुन्नरी असून चतुर व दक्ष आहे, जो सदा तप्तर व प्रकांड विद्वान आहे, जो चाणाक्ष व धूर्त आहे, अशा सर्व लक्षणानी समृद्ध असणाऱ्या सत्पुरुषास सद्गुरू मानावें हीं सर्व लक्षणें त्याच्यांत असावी लागतात.

नव्हें तेचि जालें नसें तेंचि आलें ।
कळों लागलें सज्जनाचेनि बोलें ।।
अनिर्वाच्य तें वाच्च वाचे वदावें ।
मना संत आनंत शोधित जावें ।।१८४।।

परब्रह्मा संबंधी चित्रविचित्र कल्पना पसरलेल्या आढळतात. परंतु परब्रह्माच्या खऱ्या स्वरूपाचा

उलगडा संत-सद्‌गुरूकडून करून घ्यावा. हें परब्रह्म वर्णन करण्याच्या पलीकडील असलें तरी त्या अगाध ब्रह्माचा महिमा तल्लीन होऊन तू गात जा. त्या परब्रह्माचा तू शोध घेऊन त्याच्याशीं एकरूप होऊन कायमची मुक्ति पदरांत पाडून घेण्याचा प्रयत्न तू एकसतत करीत जा.

लपावें अती आदरें रामरूपीं ।
भयातीत निश्चित ये स्वस्वरूपीं ।।
कदा तो जनीं पाहतांही दिसेना ।
सदा ऐक्य तो भिन्नभावें वसेना ।।१८५।।

ज्याठिकाणीं कसलेंच भय नाही, ज्या ठिकाणी कसलींच चिंता उरत नाही, अशा परमपवित्र श्रीरामरूपांत एकरूप होण्याची भक्तिसाधना करावी. श्रीरामभक्तींत अत्यंत तन्मयतेने तल्लीन व्हावें. म्हणज ऐहिक गुणांचा लवलेश सुद्धा

स्वतःच्या आचरणांत आढळणार नाही. श्रीरामाशीं पूर्णपणें एकरूप व्हावें. तेथें द्वैत भावना असता कामा नये.

सदा सर्वदा राम सन्नीध आहे ।
मना सज्जना सत्य शोधून पाहे ॥
अखंडीत भेटी रघूराजयोगू ।
मना सांडि रे मीपणाचा वियोगू ॥१८६॥

प्रभु श्रीराम सदासर्वदा तुझ्याजवळच आहे. ही वस्तुस्थिति असून तू ती समजावून घे. मात्र तू श्रीरामाची निष्ठेने भक्ति केली पाहिजेस. देहासक्ति तू सोडली पाहिजेस. 'श्रीराम मला कसा काय पावणार' अशा शंका मनांत न आणता निशंक मनाने श्रीरामाची संपूर्ण श्रद्धेने भक्ति करू लाग. म्हणजे श्रीरामाचा अनुग्रह तुझ्यावर झाल्याशिवाय राहणार नाही.

भुतें पिंड ब्रम्हांड हें ऐक्य आहे।
परी सर्वही स्वस्वरूपीं न साहे॥
मना भासलें सर्व कांहीं पहावें।
परी संग सोडूनि सूखी रहावें॥१८७॥

पंचमहाभूतें ही पिंडाच्या ठिकांणीं वास करतात व ब्रम्हांडाच्या ठिकाणीहि वास करता. पंच-महाभूतें, पिंड व ब्रम्हांड या दोहीना सामान्य असली व जरी ती दोघांत अन्योन्य संबंध जोडत असलीं तरी स्वस्वरूप हें या सर्वाहून वेगळें आहे. तें पंचमहाभूतासारखे वा पिंडासारखें भासमान नाही. स्वस्वरूपरूपीं ब्रम्ह गाठावयाचें असल्यास निराभास निराकारवृत्ति केली पाहिजे. म्हणजे पर-ब्रम्हाशी तादात्म्य पावण्याचें सुख पदरीं पडेल.

देहेभान हें ज्ञानशास्त्रें खुडावें।
विदेहीपणें भक्तिमार्गेंचि जावें॥

विरक्तीबळें निंद्य सर्व त्यजावें ।
परी संग सोडूनि सूखें रहावें ॥१८८॥

देहात्मबुद्धि, देहासक्ति ही ज्ञानप्रगल्ब होऊन कमी करून पूर्णपणें त्यागावी. नुसतेच ज्ञानप्रगल्ब होऊन चालावयाचें नाही. त्याबरोबर भक्ति मार्गाचा अवलंब अवश्य केला पाहिजे. अंगी वैराग्यवृत्ति म्हणजे सुखोपभोग त्यागण्याची वृत्ति बाणवून जें जें निंद्य व वर्ज्य करण्यासारखे असेल तें सर्व त्यागावें. सुखोपभोगाचा परित्याग करण्यातच खरें शाश्वत सुख आहे व कल्याण आहे.

मही निर्मिली देव तो वोळखावा ।
जया पाहतां मोक्ष तत्काळ जीवा ॥
तया निर्गुणालागि गूणी पहावें ।
परी संग सोडूनि सूखें रहावें ॥१८९॥

ह्या देवाने ही सृष्टि निर्माण केली त्या देवाची तू

मनोभावें भक्ति करीत रहा. म्हणजे तुला त्याचा अनुग्रह होऊन तुला अक्षय मोक्ष मिळेल. हाच देव निर्गुण असला तरी सगुण झालेला पहावयास मिळाला तरी त्याच्या सगुण स्वरूपाचा त्याग करून फक्त निर्गुण स्वरूपाचा स्वीकार करणें योग्य होय.

नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्ठिभर्ता ।
परेहून पर्ता न लिंपे विवर्ता ।।
तया निर्विकल्पासि कल्पीत जावें ।
परी संग सोडूनि सूखें रहावें ।।१९०।।

तो निर्गुण देव ब्रम्हदेवासारखा सृष्ठि निर्माता नाही अगर श्रीविष्णूसारखा सृष्टीचें संरक्षण कर-णाराहि नाही. तो तोंडाने, वाचेने वर्णवणार नाही अगर मोहमाया त्याला स्पर्श करू शकणार नाही, असा तो देव निराकार, निर्विकल्प जरी असला तरी त्याचें मनन करण्याचा निधिध्यास

स्वतःस लावून घेणें परमावश्यक आहे. परंतु निर्विकल्पाची कल्पना करताना तो निर्विकल्प, निर्गुण आहे हें कधीहि विसरू नये.

देहेबुद्धिचा निश्चयो ज्या ढळेना ।
तया ज्ञान कल्पांतकाळीं कळेना ॥
परब्रम्ह तें मीपणें आकळेना ।
मनीं शून्य अज्ञान हें मावळेना ॥१९१॥

देहात्मबुद्धीचा मोह व आसक्ति जो त्यागू शकत नाही. त्याला ब्रह्मज्ञान होणार नाही. मीपणाची देहासक्ति असली म्हणजे परब्रम्ह पूर्णपणें दुरावतें. जोपर्यंत मीपणाची देहात्मभावना आहे तोंवर अज्ञान दुर होऊन ब्रम्हज्ञान होणें शक्य नाही.

मना नाकळे नाढळे रूप ज्याचें ।
कुजेंवीण तें ध्यान सर्वोत्तमाचें ॥

तया खूण ते हीण दृष्टांत पाहे।
तेंथें संग निःसंग दोनी न साहे ॥१९२॥

मनाला ज्याचें स्वरूप उमगण्यासारखें नाही अथवा ज्याचें रूप कधीहि निश्चल राहतें त्याच्या स्वरूपाची तुलना कशाशीच करता येत नाही. त्याचें रूप विशद करणारी कोणतीहि उपमा दिली तर ती उपमा पूर्णपणें तोकडी पडू लागते. अशा या ब्रम्हस्वरूपाच्या ठिकाणीं मीपणाचा संग अथवा निसंग हे दोन्ही असत नाहीत.

नव्हे जाणता नेणता देवराणा।
न ये वर्णितां वेदशास्त्रां पुराणां ॥
नव्हे दृष्य अदृश्य साक्षी तयाचा।
श्रुती नेणती नेणती अंत त्याचा ॥१९३॥

ब्रम्ह हें इंद्रियांच्या साहाह्याने ज्याप्रमाणें समजत नाही. तरी तें समाजावून घेण्याचें

दुसरे मार्ग उपलब्ध आहेत. त्याचें वर्णन करण्यास वेदासारखे महान ग्रंथ सुद्धा तोकडें पडतात. तें दृष्य पण नाही. त्याचबरोबर तें अस्तित्वातचि नाही असेंहि प्रतिपादिता येत नाही. श्रृतीसारख्या श्रेष्ठ ग्रंथाना सुद्धा त्याच्या अंताचा ।त्त. लागलेला नाही.

वसे हृदयीं देव तो कोण कैसा।
पुसे आदरें साधकू प्रश्न ऐसा॥
देहे टाकितां देव कोठें रहातो।
परी मागुता ठाव कोठें पहातो॥१९४॥

ब्रम्हज्ञानाच्या हव्यासाने वाटचाल करणाऱ्या साधकास एक शंका मनांत डोकावते. ज्या देवाला आपण हृदयांत स्थान देतो तो कोण आहे व आपल्या देहाचा अंत होताच हा देव आपल्या हृदयांतून कोठें जातो? पुन्हा तो कोणत्या

ठिकाणीं आपल्याकड येतो ? त्याचें उत्तर येणें प्रमाणें आहे.

वसे हृदयीं देव तो जाण ऐसा ।
नभाचेपरी व्यापकू जाण तैसा ।।
सदा संचला येत ना जात कांहीं ।
तयावीण कोठें रिता ठाव नाहीं ।।१९५।।

तुझ्या हृदयांत जो देव आहे तो आकाशाप्रमाणें अतिव्याप्त असून तो सर्वत्र सामावून राहिलेला आहे. तो सदासर्वदा सर्वत्र वास करतो, एखाद्या ठिकाणाहून दुसरीकडे असा तो फिरस्ता नाही. ज्याने व्यापलेली नाही अशी एकहि जागा अगर वस्तु या पृथ्वीतलांवर नाही. तो अणुरेणू व्यापून राहिलेला आहे.

नभीं वावरे जो अणुरेणु कांहीं ।
रिता ठाव या राघवेंवीण नाहीं ।।

तया पाहतां पाहतां तेंचि जालें ।
तेथें लक्ष आलक्ष सर्वै बुडाले ।।१९६।।

आकाशापासून ते पृथ्वीपर्यंत सर्वत्र तो पसरलेला आहे. प्रभु श्रीराम ज्यांत सामावलेला नाही अशी एकपण वस्तु सापडणार नाही. श्रीराम सर्वत्र व्यापून राहिलेला आहे अत्यंत आदराच्या भक्ति-भावनेने जे त्याला पाहण्याचा प्रयत्न करतात ते स्वतः राममय होऊन जातात. श्रीरामरूपात समरस झाल्याने त्याना दृष्य-अदृष्य अथवा वस्तु व श्रीराम अशी भेदभावाची द्वैती भावना यांचा लवलेश सुद्धा त्याना वाटेनासा होतो.

नभासारिखें रूप या राघवाचें ।
मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचें ।।
तया पाहतां देहबुद्धी उरेना ।
सदा सर्वदा आर्त पोटीं पुरेना ।।१९७।।

आकाश जसे अति भव्य उदात्त आहे, तसें या प्रभु श्रीरामाचें स्वरूप आहे या श्रीरामाचें निष्ठेने चिंतन व नामस्मरण केलें असता या प्रपंचाचा कधीच न संपणारा फेरा कायमचा संपुष्टात येतो. त्याच्या दर्शनें करून 'मी देहाचा व हा देह माझा' ही देहात्मभावना पूर्णपणें नाहीशी होते. त्या श्रीरामास कितीहि पाहतो म्हटले तरी कधीच तृप्ती होत नाही, अशी त्याच्या स्वरूपाची गोडी अवीट आहे.

नभें व्यपिलें सर्व सृष्टीस आहे।
रघूनायका उपमा ते न साहे ॥
दुजेवीण जो तोचि तो ही स्वभावें।
तया व्यापकू व्यर्थ कैसें म्हणावें ॥१९८॥

या सर्व सृष्टीस झाकून सुद्धा पुन्हा उरणारें आकाश सुद्धा प्रभु श्रीरामच्या व्यापकतेची तुलना करण्यास पूर्णपणें तोकडें पडते. त्याच्या येवढें व्यापक या जगांत दुसरें काहीच नाही.

म्हणून आकाश सर्वव्यापक आहे असें म्हणणें व्यर्थ आहे.

अती जीर्ण विस्तीर्ण तें रूप आहे ।
तेथें तर्कसंपर्क तोही न साहे ।।
अती गूढ तें दृढ तत्काळ सोपें ।
दुजेवीण जें खूण स्वामीप्रतापें ।।१९९।।

ब्रम्हस्वरूप हें अत्यंत विस्तीर्ण असून तें अति अनादी पण आहे त्याच्या अंताचा थांगपत्ता शोधून काढणें मानवाच्या बुद्धीच्या कुवती बाहेरचें आहे. तें अतिगूढ जरी असलें तरी सद्गुरुकृपेंमुळे त्याचें आकलन होऊ शकेल. 'त्याच्या सारखें तेंच फक्त एकटें आहे.' असा अनुभव आपणास ब्रम्हाच्या बाबतीत येऊ लागतो. परंतु हें सद्गुरु करूनच उमजावयाचें

कळे आकळे रूप तें ज्ञान होतां ।
तेथें आटली सर्वसाक्षी अवस्था ।।

मना उन्मनीं शब्द कुंठीत राहे।
तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहे ॥२००॥

सद्गुरुकृपेमुळे ब्रम्हज्ञान होऊन श्रीरामाचें अणु-रेणूंत सामावलेलें स्वरूप समजू लागते. मात्र तें उमगलें तरी डोळ्याला कसकसें दिसेल तें वर्णन करता येत नाही. श्रीराम स्वरूपांत मन येवढें दिग्मूढ होते की त्याचें वर्णन करण्यास शब्दच तोंडांतून बाहेर पडू शकत नाहीत. असा तो परम-पवित्र प्रभु श्रीराम सर्वत्र वास करुन आहे.

कदा वोळखीमाजि दूजें दिसेना।
मनीं मानसीं द्वैत कांहीं वसेना ॥
बहूतां दिसां आपुली भेटि जाली।
विदेहीपणें सर्व काया निवाली ॥२०१॥

श्रीरामस्वरूपांत समरस झाल्यांमर दुसरें काहीच दिसेंनासें होतें फक्त श्रीरामाचें स्वरूपच सर्वत्र दिसू लागते. त्यामुळे द्वैत भावना मनांतून समूळ

नाहीशी होते. श्रीरामाची अलौकिक भेट झाल्याने मन आनंदमय बनतें व इकडे देहासक्ति समूळ नाहीशी झाल्याने ताप व यातना नाहीशा होऊन शरीर पूर्णपणें शांत होतें. असा प्रभु श्रीरामाचा अलौकिक महिमा आहे.

मना गूज रे तूज हें प्राप्त जालें ।
परी अंतरीं पाहिजे यत्न केले ॥
सदा श्रवणें पाविजे निश्चयासी ।
धरी सज्जनसंगती धन्य होसी ॥२०२॥

बा मना, हें ब्रम्हज्ञान तुला व्हावें व प्रभु श्रीरामाचें अलौकिक दर्शन व्हावें असें तुला वाटत असल्यास तुला अतःकरणपूर्वक सारखे प्रयत्नशील राहिले पाहिजे. त्यासाठी दुसऱ्या दैवताचें ध्यान करता कामा नये. प्रभु श्रीराम हेंच सर्वश्रेष्ठ दैवत होय असा दृढ विश्वास तू बाळगला पाहिजेस. यासाठी संत लोकांचे मार्गदर्शन तुला लाभलें पाहिजे.

मना सर्वही संग सोडूनि द्यावा ।
अती आदरें सज्जनाचा धरावा ॥
जयाचेनि संगें महादुःख भंगे ।
जगीं साधनेंवीण सन्मार्ग लागे ॥२०३॥

हे मना, तू या देहाची व प्रपंचाची आणि मोहाची आसक्ति पूर्णपणें सोडून दे. त्याऐवजी संतरूपी सद्गुरूच्या पवित्र उपदेशाची आसक्ति मात्र जरूर राख. त्या सद्गुरूच्या उपदेशमार्गदर्शनाने खडतर व असह्य दुःख यातनासुद्धा जादू केल्यागत दूर होतात. कोणतीहि यातायात न पडता विनासायास लोकोत्तर अशी सद्गति लाभून शाश्वत मुक्ति पदरी पडते. असा संत-सत् पुरुषांचा अलौकिक महिमा आहे.

मना संग हा सर्वसंगास तोडी ।
मना संग हा मोक्ष तत्काळ जोडी ॥

मना संग हा साधकां सीघ्र जोडी ।
मना संग हा द्वैत निःशेष मोडी ॥२०४॥

मना, संत उपदेशाची आसक्ति सर्व ऐहिक आसक्तिना समूळ नष्ट करणारी आहे त्यामुळे मोक्ष अत्यंत त्वरेने हमखास पदरी पडतो. हा संत उपदेश मोक्षपथावर वाटचाल करणाऱ्या साधकास बिनासायास व अत्यंत त्वरेने मोक्षाप्रत आणून सोडतो. हा संत उपदेश भोगासक्ति बरोबरच श्रीरामाबद्दलची द्वैती विषारी भावना सुद्धा पूर्णपणें नाहीशी करतो. म्हणून बा मना, संत उपदेशाची परमनिष्ठेने कास धरण्याचा सज्जनपणा तू दाखविण्याची नितांत आवश्यकता आहे.

मनाचीं शतें ऐकतां दोष जाती ।
मतीमंद ते साधना योग्य होती ॥

चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं ।
म्हणे दास विश्वासतां मुक्ति भोगी ॥२०५॥

आतापर्यंत आपण वाचलेल्या ऐकलेल्या या अलौकिक ग्रंथउपदेशाची फलश्रुती म्हणजे याच्या वाचनाने सर्व प्रकारचे दोष पूर्णपणें नाहीसे होतात. अगदी अज्ञानी लोकसुद्धा मोक्ष प्राप्तीस सुयोग्य बनून त्याना बिन यातायातीने मोक्ष प्राप्त होतो. या ग्रंथांच्या वाचनाने माणूस ज्ञानप्रगल्ब होऊन त्यास श्रेष्ठ अशी विरक्ति प्राप्त होते व अलौकिक असें आत्मिक सामर्थ्य प्राप्त होते. मनाचा दुबळे-पणा जाऊन मन कणखर व पोक्त-विवेकी बनते. या ग्रंथांत प्रतिपादलेलीं तत्वें व उपदेश जो निष्ठेने आचरेल व त्यावर निस्सिम निष्ठा ठेवेल त्याला खचितच साधीसुदी नव्हे तर कधीच क्षय न पावणारी मुक्ति मिळाल्याशिवाय राहणार नाही

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

जिज्ञासा प्रकाशन

-: प्रकाशित पुस्तके :-

विवाह मंगळाची अनावश्यकता	पैसे १००
हस्तसामुद्रिकशास्त्राचा आनामा	पैसे ४००
मुख सामुद्रिक विद्या	पैसे २००
स्वप्ने भविष्य सांगतात	पैसे १६०
सार्थ मनाचे श्लोक	पैसे १३०
पादतल सामुद्रिक विद्या	पैसे २००
असा आहे श्रीविठ्ठल	पैसे १७५
अशी आहे श्रीशांतादुर्गा	पैसे ४००
श्रीशांतादुर्गा उपासना	पैसे ०४०
असा आहे श्रीमंगेश	पैसे ३५०
शकुन भविष्य सांगतात	पैसे १२५
नेपोलियन भविष्य सांगतात	पैसे ०४५

अशी पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत.

आपण ती अवश्य वाचावीत